कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क




• पुणे • वर्ष १३ वे • अंक १ ला • एप्रिल - जून २०१७ • किंमत रु. २०/- • पृष्ठसंख्या ४० • वार्षिक वर्गणी रु. १००/-



# कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ, पुणे



श्री. वासुदेव रायकर, डोंबिवली (सदस्य), श्री. संजय आंबर्डेकर, ठाणे (कोषाध्यक्ष), श्री. श्रीगजानन गुर्जर, पुणे (संपादक-'संपर्क'), श्री. अविनाश जावडेकर, नागपूर (सदस्य), श्री. गणेश गुर्जर, पुणे (कार्यवाह), श्री. विजय आंबर्डेकर, मुंबई (अध्यक्ष), श्री. आनंदराव खंडकर, कोल्हापूर (सदस्य), श्री. सुनील खेर, नाशिक (सदस्य)


## जाहिरातीचे दर

| पान | एकवेळ | चारवेळा |
|---|---|---|
| पाव | ४००/- | १५००/- |
| अर्धा | ८००/- | ३०००/- |
| पूर्ण | १६००/- | ६०००/- |
| शुभेच्छा | २५०/- | १०००/- |
| पूर्ण पान रंगीत | २५००/- | १००००/- |
| पृष्ठदान | १००/- | - |



**नियतकालिकाचे नाव :** कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे ''संपर्क''



**पत्ता:** द्वारा कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे
ऑफिस क्र. २, अनिश प्रासाद अपार्टमेंट्स,
४३७ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.
**संपर्क:** ऑफिस ०२०-२४४३२४४३
मोबाईल ८१४९९०७७८९
Email: bkbmsindia@gmail.com



**कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे ''संपर्क'' हे त्रैमासिक मालक, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ (विश्वस्त) यांचेसाठी प्रकाशक-सचिव श्री गणेश गुर्जर यांनी मुद्रक श्री जे प्रिंटर्स प्रा. लि., १४१६, सदाशिव पेठ, पुणे येथे छापून ४३७, नारायण पेठ, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले.**

**संपादक - श्री. श्रीगजानन गुर्जर**

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ

ॐ

स्थापना
१९९१

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे

# संपर्क

संपर्कात राहु या ! संपर्क वाढवू या !!

कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाने कऱ्हाडे ज्ञाती बांधवांसाठी
चालविलेले नियतकालिक (खाजगी वितरणासाठी)

वर्ष १३ वे | एप्रिल - जून २०१७ | अंक १ ला

अध्यक्ष : श्री. विजय आंबर्डेकर
मोबा. : ९८१९८८५६६५

सचिव : श्री. गणेश गुर्जर
मोबा. : ९८९०९९०११३

कोषाध्यक्ष : श्री. संजय आंबर्डेकर
मोबा. : ९८२०४ १७९८१

संस्था नोंदणी क्र. महा-१४३६/२०१५ दि. २०/१०/१५ पुणे विश्वस्त संस्था नोंदणी क्र एफ४६५२३ पी दि. ३/३/२०१६

**संपादक : श्री. श्रीगजानन गुर्जर**
पुणे ९९७०१ ७४८१८ / ८८०६३ ९५८८० (WhatsApp)

**शहर प्रतिनिधी**

श्री. प्रसाद पंडीत, मुंबई, ९८६९१ ५५२१५
श्री. चंद्रशेखर जोशी, बेळगांव, ९४४९० ५१६५३
श्री. प्रदिप हळबे, डोंबिवली, ९८३३१ ६३६५९
श्री. अविनाश जावडेकर, नागपूर ९८६०२ ५७३१५
सौ. अंजली माईणकर, सोलापूर, ८८८८२ २१७४६
सौ. मानसी मोघे, सातारा, ९०११० ८२३०८
श्री. सुनिल जठार, रत्नागिरी/राजापूर, ९२७०५ ७९४००
श्री. मिलिंद पावनगडकर, कोल्हापूर, ९२२५८ ००५८७
श्री. जयंत लघाटे, मुलुंड, ९९६९० ३७३४१
श्री. हेमंत हिर्लेकर, पुणे, ९८२२० ४२८६३
श्री. निळकंठ मुळये, बडोदा, ९८२५६ ८५९७३
श्री. शरद खांडेकर, सांगली, ९८२२९ ९५८९२
श्री. गजानन सायनेकर, गोवा, ९९२३७ ९९६७९
श्री. विनायक उमर्ये, जि. सिंधुदुर्ग, ९४२३८ ८०१३८
श्री. अजित सरवटे, ठाणे, ९८८७२ ०५६९०
सौ. सुप्रिया फणसळकर, नाशिक, ९४०३१ ४८७७५

## आवाहन

'संपर्क'च्या सर्व वर्गणीदार, जाहिरातदार, हितचिंतक यांना आवाहन करण्यात येते की आपली वार्षिक वर्गणी आता रु. ३००/-, रु. ५००/- अशी किमान तीन वर्षे व कमाल पाच वर्षेसाठी स्वीकारली जाईल. कृपया बँकेमध्ये कोणीही स्वत: रक्कम न भरता आपल्या शहर प्रतिनिधींकडे संपर्क साधून जमा करावी **(पुण्यातील वर्गणीदारांनी त्यांची संपर्क वर्गणी; कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे-३० च्या कार्यालयात येऊन भरावी. त्यांचे स्वागत आहे)**. शहर प्रतिनिधींनी सर्व वर्गणी गोळा झाल्यावर सभासदांची यादी, वर्गणी रक्कम आणि रक्कम जमा केलेल्या पावतीची झेरॉक्स प्रत पाठवावी. या दोन्ही गोष्टी आल्याशिवाय वर्गणी सभासदाच्या खात्यावर जमा होऊ शकणार नाही. महासंघाचे खाते बँक ऑफ इंडिया, कर्वेनगर, पुणे येथे असून त्याचा क्रमांक ०५५२१०११०००४००८ असा आहे. IFSC Code BKID0000552 आहे. जाहिरातदारांनी आपल्या जाहिरातीचा मसुदा व चेक फक्त कार्यालयांतच पाठवावा.

**श्रीगजानन गुर्जर**
संपादक

संपर्क

# अनुक्रमणिका


- वाचकांशी हितगुज ३
- श्रीभागवत सुभाषित – लक्ष्मीकांत जोशी ४
- देव तारी त्याला कोण मारी? – अनिल तळवलकर ५
- आडनावांची गंमत (कविता) – प्रदीप पु. सातवळेकर ७
- सुंदर सुविचारांचे संकलन – अंजली प्रसाद पंडित ९
- पुन्हा भेटली झाशीची राणी १०
- संस्थावृत्त

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे (गुजरात) ११

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे – तिळगूळ समारंभ १२

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे – तिळगूळ समारंभ २०१७ १२

  कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली १३

  कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई – जागतिक महिलादिन १४
- उन्हामुळे मृत्यू का होतो? १५
- गाजराचे खमंग वडे, रुचकर पाककृती – कमला कळके १६
- 'ब्राह्मणभूषण'ने उद्योजकतेचा गौरव १८
- Sethu Bandhu - Girish Bharadwaj १९
- मंत्र – श्रीगजानन गुर्जर २१
- शिपोशीकरांचा नाथ – वसंत रघुनाथ आठल्ये २४
- स्वप्नशास्त्र २८
- सर्व कऱ्हाडे ब्राह्मण संघ आणि सभासदांसाठी महत्त्वाचे निवेदन ३०
- रोज वापरल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांतील 'भेसळ' ओळखण्यासाठी काही खास टिप्स ३२
- पर्यावरण / समाजकारण ३३
- सुखी व्हायचंय? ३४


सदर नियतकालिकातील मजकूराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. – संपादक

# वाचकांशी हितगुज

नमस्कार,

गेल्या काही दिवसांत काही वाचकांनी आम्हाला 'संपर्क'चा अंक मिळाला नसल्याचे कळविले. आम्ही, 'असे का घडले असावे?'; याचा शोध घेतला असता, आम्हाला पुढील कारणे प्रामुख्याने जाणवली. त्यांत महत्त्वाचे कारण म्हणजे अशा बहुतेक वाचकांची 'संपर्क'ची वर्गणीची मुदत संपलेली आहे व त्यांनी पुढील वर्गणी भरून नूतनीकरण केलेले नाही. त्यामुळे त्यांना 'संपर्क'चा अंक मिळालेला नाही.

ह्याबाबत आम्ही आपणांस सांगू इच्छितो की, आपण जर आपल्या अंकावर चिकटविलेला आपला पत्ता नीट निरखून पाहिलात तर आपल्या लक्षात येईल की आपल्या संपूर्ण नावाच्या वरच्या ओळीवर आकडे छापलेले आहेत, ते समजून घ्या. त्यात पहिला चार अंकी आकडा म्हणजे तुमचा R. No. (Registration No.) आहे. मधला आकडा तुमचे नाव ज्या लिस्ट मध्ये आहे; त्या लिस्टचा नंबर आहे. आणि महत्त्वाचा तिसरा आकडा म्हणजे तुमची वर्गणी ज्या महिन्यापर्यंत आणि वर्षांपर्यंत आलेली आहे. त्याचे निदर्शक आकडे आहेत. उदा. ०१/१८ म्हणजे जानेवारी २०१८. याचा अर्थ जानेवारी २०१८ पर्यंतचे सर्व अंक आपल्याला मिळतील. पण त्या नंतरचे अंक आपण जर पुढील वर्गणी भरून नूतनीकरण केलेत तरच येतील, अन्यथा नाही. सांगायचा मुद्दा असा की, आपली वर्गणी संपली आहे हे सांगायला आपल्याला कोणत्याही स्मरणपत्राची आवश्यकता नाही. आपला अंक हाच आपला Reminder आहे हे लक्षात घ्या आणि ज्यांची वर्गणी संपलेली आहे त्यांनी पुढील वर्गणी भरून नूतनीकरण करावे अशी आपल्याला यानिमित्ताने आम्ही विनंती करतो. यावेळेला ज्यांची वर्गणी संपलेली आहे अशांना सुद्धा Goodwill gesture म्हणून अंक पाठविला आहे. पण यापुढे मात्र वर्गणीचे नूतनीकरण केल्यावरच आपल्याला अंक मिळणार आहे.

दुसरे असे की, काही वाचकांनी त्यांचे बदललेले पत्ते आम्हाला कळविले नाहीत, त्यामुळे त्यांच्या जुन्या पत्त्यावर अंक पाठविले गेले आहेत. तेव्हा विनंती की, पत्त्यातील बदल कळवा किंवा पत्त्यातील चुका आमच्या निदर्शनास आणा. यासाठी WhatsApp वर कळविले तरी चालेल. नवीन तंत्राचा वापर करून आपण आपल्या समस्या लवकर सोडवू शकतो.

तरी सर्वांना विनंती की, आपल्या वर्गणीचे नूतनीकरण करून त्वरित 'संपर्क'चा अंक मिळवा आणि सन्माननीय वर्गणीदार म्हणून सातत्य राखा.

धन्यवाद!

संपादक

# ।। श्रीराम समर्थ ।।
# श्रीभागवत सुभाषित



यत: पापीयसी कीर्तिरधर्मश्च महानृणाम् ।
यतो विरोध: सर्वेषां यत आधिरनन्तक: ।।४४।।

कस्तं प्रजापदेशं वै मोहबन्धनमात्मन: ।
पण्डितो बहु मन्येत यदर्था: क्लेशदा गृहा: ।।४५।।

(श्रीमद् भागवत ४/१३/४४,४५)

**भावार्थ :**

ज्याच्या करणीमुळे माता-पित्याचे सर्व यश धुळीला मिळते, अधर्माचा भागीदार व्हावे लागते, सगळ्यांकडून विरोध सहन करावा लागतो, कधीही न संपणारी चिंता लागून राहते आणि घरही दु:खदायी होते; अशा आत्म्याचे मोहमय बंधन असणाऱ्या फक्त नावाच्या संतानासाठी कोणता शहाणा पुरुष लालचावेल?

महाराज अंग याचा पुत्र वेन अत्यंत क्रूर व निर्दयी होता. त्याची दुष्ट प्रवृत्ती पाहून राजा अंगाने त्याला समजावण्याचा, सुधारण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु वेन सन्मार्गावर आला नाही. राजा अंग याला अत्यंत दु:ख झाले.

पुत्र व्हावा तो कुळाचा किंवा वंशाचा दिवा आहे, अशी भावना आजही अनेकांची आहे. बदलत्या सामाजिक वातावरणात आता मुलींनाही महत्त्व आलेले आहे. प्रसंगी कुटुंबात मुलगी हे एकच अपत्य असेल, तर तिच्याविषयी जणू काही मुलगाच या भावनेने बघितले जाते. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा । ज्याचा तिन्ही लोकी झेंडा ।।' याचा भाव असाच आहे की, पुत्राने ज्ञानसंपन्न-गुणसंपन्न व्हावे. समाजात मानमान्यता प्राप्त करावी. कुळाचे नाव उज्ज्वल करावे. आपल्या मुलाचा-मुलीचा गौरव बघताना कुणाही माता-पित्याला काहीशी कृतार्थता जाणवते.

परंतु मुलाने सुसंस्कारित वळण पूर्णपणे बाजूला ठेवले, अयोग्य जीवनप्रणाली स्वीकारली; तर नवस-सायासाने झालेल्या मुलांविषयीसुद्धा माता-पिता अत्यंत निराश होतात.

पुत्राच्या अयोग्य वर्तनाने आई-वडिलांचा असलेला सामाजिक गौरव धुळीला मिळतो. त्याच्या अधर्मशील वर्तनाचे भागीदार व्हावे लागल्याने मान खाली जाते. आपण मुलाला संस्कार दिले नाहीत, वळण लावले नाही म्हणून आजूबाजूचे परिचित, आपलेच नातेवाईक आपल्याला दोष देतात. अपमानितही करतात. या मुलाच्या भविष्यात काय आहे, या चिंतेने सगळे- विशेषत: माता-पिता ग्रासले जातात. दु:खी होतात. संपूर्ण परिवारच काहीसा दु:खी कष्टी होतो. अशा अपत्याचे असणे म्हणजे केवळ म्हणायला कुळाचा कुलदीपक! परंतु अपत्य सुखकारक नाही अशी जर प्राक्तनाची रेषा कळली, तर मग कुणीच शहाणा माणूस संततीसाठी आग्रही होणार नाही. अशा संततीचे असणे म्हणजे फक्त तो त्याच्या नावानंतर पिता म्हणून आपले नाव लावतो एवढ्यापुरतेच मर्यादित होते. आपली संतती उत्तम निघाली, तर तिच्या गौरवात आपला अप्रत्यक्ष गौरव होतो. परंतु तीच संतती जर अयोग्य वळणाची निघाली, तर कोण आपलं दु:ख सुसह्य करणार?

**लक्ष्मीकांत जोशी, नाशिक**
मोबा. ९९७०९३०२७६

***वसंतोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा***
**श्री. विनायक उमर्ये, आंजगांव, सिंधुदुर्ग - मो. ९४२११३७६६७**

# देव तारी त्याला कोण मारी?



मराठीत दोन म्हणी, 'देव तारी त्याला कोण मारी?' व 'काळ आला होता, पण वेळ आली नव्हती.' दोन्हींचा अर्थ जवळजवळ सारखाच. आपल्यापैकी किती जणांना प्रत्यक्ष अनुभवावयास मिळतात? खूप वर्षांपूर्वी मला त्याचा अनुभव आला. काळाच्या ओघात त्या आठवणी मनाच्या कोठल्या तरी कोनाड्यात दडल्या. काही दिवसांपूर्वी दै. सकाळमधे या म्हणींवर आधारित एक प्रसंग वाचला आणि त्या आठवणींना परत उजाळा मिळाला. नजरेसमोर त्या अशा तरळल्या की, जणू नुकत्याच घडून गेल्या आहेत!

सन १९६५ च्या भारत-पाक युद्धात ज्या वेळेस माझे युनिट युद्धात उतरले, त्या वेळेपर्यंत भारतीय सैन्याने अमृतसर-वाघा-लाहोर या भागात जोरदार मुसंडी मारून पाकिस्तानचा खूप मोठा भाग ताब्यात घेतला होता. लाहोरपासून फक्त २५ कि.मी. अंतरावर असलेल्या इछोगिल नावाच्या संरक्षणासाठी बांधलेल्या कॅनॉलवर पाकिस्तानने आपल्याला थोपवून धरले. त्या कॅनॉलवर दोन पूल होते. एक रस्त्याचा व एक रेल्वेचा. हे पूल ताब्यात आले असते, तर पुढील आगेकूच सोपी झाली असती.

पुढे जाण्यासाठी केलेल्या आक्रमणात माझ्या युनिटला- आता 'समझोता एकप्रेस' ज्या रुळांवर धावते, त्या लाईनचा- कॅनॉलवरील पूल व त्या शेजारील दोन गावे ताब्यात घेण्याचा हुकूम मिळाला. ठरल्याप्रमाणे आम्ही आक्रमण केले. धुमश्चक्री झाली, परंतु पूल उडवून पाकिस्तानी सैन्याने कॅनॉलपलीकडे मोर्चे सांभाळले. आम्हाला दोन गावांवर व कॅनॉलच्या अलीकडच्या काठावर मिळालेल्या नियंत्रणातच समाधान मानावे लागले.

युद्धशास्त्राप्रमाणे आक्रमण करून कोठलाही भाग ताब्यात घेतला की, लगेच त्या भागाची मोर्चेबांधणी केली जाते. म्हणजे त्यानंतर जर शत्रूने प्रतिहल्ला केला, तर तो परतवता येतो. त्याशिवाय अशा वेळेस एकमेकांवर खूप मोठ्या प्रमाणात गोळीबार चालू असतो आणि त्यापासून बचावासाठीदेखील मोर्चे खोदणे जरुरीचे असते. पंजाबमधील शेतजमीन अतिशय मऊ आहे. त्यात मोर्चे खोदणे तसे सोपे होते. म्हणून आक्रमण संपल्यावर काही तासांतच प्रत्येक तुकडीने आपल्या संरक्षणासाठी खंदक (मोर्चे) तयार केले.

माझी त्या वेळेस जेमतेम दोन वर्षे नोकरी झाली होती. सेकंड लेफ्टनंट रँकचा सर्वांत कनिष्ठ ऑफिसर होतो. तसे बघावयास गेले तर- जे सीनिअर होते, त्यांच्यापैकीदेखील कोणालाच युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव नव्हता. शिक्षण कितीही घेतले तरी त्याला प्रत्यक्ष युद्धाच्या अनुभवाची सर येत नाही. शिक्षण घेताना हत्यारे वापरण्याचे, डावपेच कसे आखायचे, प्रत्यक्ष हालचाली कशा करावयाच्या, शत्रूच्या फायरपासून बचाव कसा करायचा, प्रतिआक्रमण कसे व केव्हा करायचे वगैरे किती तरी तऱ्हेचे, किती तरी रीतीने, प्रत्येक वेगळ्या परिस्थितीला कसे सामोरे जायचे याची लुटुपुटुची लढाई करून शिक्षण दिले जातेच. परंतु, प्रत्यक्ष युद्ध हे अनुभवावेच लागते आणि ते फक्त युद्धभूमीतच अनुभवता येते.

कानाला चाटून जाणाऱ्या गोळ्यांचा आवाज, अचानक येऊन कर्णकर्कश आवाज करत फुटणारे तोफगोळे, तोफांच्या जबरदस्त भडिमाराने उडवलेली माती व धूर, उद्ध्वस्त केलेली घरे, झाडांच्या फांद्या व पाने तुटून पडल्याने उरलेली खोडे, जमिनीवर जागोजागी पडलेले मोठमोठे खड्डे, रणगाड्यांचा धडधटात वरून झेपावणारी विमाने, जखमींचे ओरडणे-किंचाळणे, मातीने माखलेले चेहरे व त्यावर असणारे भीती, द्वेष, शत्रूवरचा राग, काही वेळा असहायपणा- असे वेगवेगळे भाव... ज्या भूमीवर काही दिवस युद्ध चालू असेल, तेथे मेलेल्या गुरांचा सडका वास व

एकंदरीतच भीतीचा वास (भीतीला वास असतो हे सांगितले- तर ज्यांनी अनुभवले नाही त्यांना खरे, देखील वाटणार नाही) अशी ती युद्धभूमी- शांततेच्या काळात, शिक्षण घेत असताना अनुभवणे- अशक्यच.

शांततेच्या काळात बरॅकमध्ये ट्रेनिंग घेताना, आर्मीचे वेगवेगळे कोर्स करताना सगळ्यात पुढे असणारे, 'वाघ' समजले जाणारे, एकदा का गोळ्या डोक्यावरून जायला लागल्या की भीतीने कसे पांढरेफटक पडतात व शेपट्या घालतात, ते मी बघितले. त्या विरुद्ध काही लोक- जे शांततेच्या काळात मवाळ, शामळू व फारसे अव्वल वाटत नाहीत; ते प्रत्यक्ष युद्धात उतरले की कसे वाघासारखे निर्भयपणे वावरतात, ते- देखील बघितले. प्रत्यक्ष युद्ध सुरू झाले की, काही वेळातच मुले पुरुष बनतात. म्हणूनच युद्धाचा अनुभव माणसाला स्वत:चा स्वत:लाच घ्यायला लागतो, तो कोणीच कोणाला देऊ शकत नाही.

एक-दोन दिवसातच आम्हा सर्वांनादेखील त्या युद्धभूमीची सवय झाली. ट्रेनिंगपेक्षा युद्धभूमीवर सगळेच फार लवकर शिकतात. कारण न शिकणे म्हणजे मरण, हे सगळ्यांनीच ओळखलेले असते. युद्धभूमीवर प्रत्येक जण काहीही काम करत असला तरी त्याचे डोळे व कान एक वेगळा अंदाज घेण्यात सतत गुंतलेले असत. आम्हाला रायफल/मशिनगन्सच्या गोळ्यांचा धोका नव्हता, पण लांब पल्ल्याच्या तोफा व उखळी तोफांचा (मॉर्टर) खूप धोका होता. तोफेतून निघालेला गोळा साधारणपणे जमिनीला समांतर जातो आणि हवेतून जात असताना शीळ घातल्यासारखा आवाज करतो. त्यामुळे तो आपल्याकडे येत आहे किंवा दूर जात आहे, याचा अंदाज करता येतो व मोर्चात लपता येते. याविरुद्ध उखळी तोफांचा गोळा आकाशात खूप वर जातो व खाली येत असताना जर बरोबर डोक्यावर आला, तर त्याचा स-स-स असा आवाज येतो. अर्थात, तोपर्यंत फार उशीर झालेला असतो. म्हणूनच युद्धभूमीवर प्रत्येकाचे कान तोफांच्या आवाजाकडे असायचे आणि आपल्या जवळात जवळ खंदक कोठे आहे हे डोळे बघत असायचे.

मोर्चेबांधणी केल्यानंतर तिसरा किंवा चवथा दिवस होता. आता आम्ही सगळेच युद्धभूमीला सरावलो होतो. त्या दिवशी सकाळी ९/९॥ च्या सुमारास मी, माझ्याबरोबरचाच सेकंड लेफ्टनंट कर्तारसिंग व आर्टिलरीचा ऑफिसर कॅप्टन सरबजित हे माझ्या कंपनीमध्येच गप्पा मारत बसलो होतो. कर्तार व सरबजित एकाच मोर्चात पाय खाली सोडून काठावर बसले होते आणि मी त्यांच्यापासून काही अंतरावर दुसऱ्या मोर्चात होतो. अगोदरचे तीन दिवस आम्ही पाकिस्तान आर्टिलरीने अवलंबिलेला परिपाठ बघितला होता. तो म्हणजे, ते सकाळी उठल्याबरोबर खूप मोठ्या प्रमाणात तोफांचा भडिमार करत. आम्ही त्याचे नाव 'वेक अप कॉल' ठेवले होते. नंतर लंचच्या वेळेपर्यंत शांत राहून ते परत भडिमार करत.

परंतु, त्या दिवशी वेक अप कॉल- नंतर त्यांनी अचानक ९॥/१० वाजताच जबरदस्त भडिमार सुरू केला. त्यातून त्यांनी एकदम उखळी तोफांचा मारा केला. जेथे कर्तार व सरबजित बसले होते, त्यांच्या बरोबर समोर येऊन तोफेचा एक गोळा फुटला. त्या दोघांना मोर्चाच्या काठावर बसले असताना, आत उडी टाकायलादेखील वेळ मिळाला नाही. गोळा फुटला त्या वेळेस दोघेही एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून बसले होते. गोळ्यातून निघालेले लहान-लहान शार्पनेल (धातूंचे तुकडे) फवाऱ्यासारखे उडाले आणि कर्तारच्या कमरेपासून खांद्यापर्यंत पूर्ण भागात लागले. सरबजितला मात्र एकच तुकडा नाकावर लागला.

सरबजितने तोंडावर हात धरून त्याच मोर्चात खाली बसकण मारली, तर कर्तार (बहुधा तो त्या वेळेपर्यंत अर्धवट मरणप्राय अवस्थेत असेल) तिडबिडत उठला, त्याने एक-दोन पावले पुढे टाकली आणि तो खाली उघड्यावर कोसळला. त्याच्या दोन्ही बाजूस असलेल्या मोर्च्यांमधून दोन जवानांनी आपला अधिकारी पडला हे बघून त्याला उचलण्यासाठी पुढे धाव घेतली. ते त्याला उचलत असतानाच एखादी सर पडावी असे धाड धाड धाड तीन गोळे त्यांच्यावर पडले व तिघेही छिन्नविच्छिन्न झाले.


सरबजित एका तासातच नाकावर लहानशी पट्टी बांधून (बँडएडसारखी) परत आला. पुढे त्याच युद्धात नव्हे, तर १९७१ च्या बांगलादेशच्या युद्धातदेखील त्याने भाग घेतला आणि आपली नोकरी पूर्ण करून ९४/९५ मध्ये निवृत्त झाला. काळ रूपाने तो तोफेचा गोळा आला खरा, पण देवालाच त्याला तारायचे होते म्हणून तो वाचला.

याच युद्धातील आणखी एक अनुभव-युद्ध विरामच्या दोन दिवस अगोदर परत असाच मी आपल्या कंपनीमध्ये असताना, दुपारच्या वेळेस पाकिस्तानने खूप जोरात तोफांचा भडिमार सुरू केला. तोपर्यंत आम्ही आमचे मोर्चे आणखी खोल व मजबूत

केले होते. माझ्या कंपनीतील हवालदार रामकिशन याने फायर सुरू झाल्याबरोबर एका मोर्चात आश्रय घेतला. योगायोगाने आर्टिलरीचा एक गोळा त्या मोर्च्याच्या अगदी काठावर आपटून फुटला व तो पूर्ण खंदक कोसळला. आम्हाला वाटले की, अगदी डायरेक्ट हिट झाली व रामकिशन गेला. १५/२० मिनिटांनंतर भडिमार थांबल्यावर आम्ही सर्व त्याच्या मोर्चाकडे धावलो. मातीच्या ढिगाऱ्यात रामकिशन दिसतच नव्हता. माती उकरून त्याला बाहेर काढले, तर थोड्या वेळातच तो शुद्धीवर आला. पूर्ण तपासणी अंती लक्षात आले की त्याच्या अंगावर एक ओरखडाही नाही; फक्त त्याला काहीही ऐकावयास येत नव्हते. थोड्या दिवसांत त्याची श्रवणशक्तीदेखील सुधारली, पण तो थोडासा बहिरा राहिला. त्याच्या बाबतीत जिवावर बेतले, पण शेपटावर निभावले– ह्या म्हणीची प्रचिती आली.

माझ्या स्वत:च्या बाबतीत जर सांगायचे झाले तर, पहिल्यापासूनच मी दैववादी होतो. प्रथम आर्मी व नंतर पॅरॅशूट रेजिमेंटमध्ये भरती झालो; तेव्हा माझ्या नाराज झालेल्या आईला सांगितले– देखील की, जर मला मरण यायचेच असेल तर ते पुण्याच्या रस्त्यावर गाडी चालवतानासुद्धा येऊ शकते. नोकरीच्या सुरुवातीलाच हे दोन्ही अनुभव आल्यानंतर माझी आणखीनच खात्री झाली की, जर एखाद्या गोळीवर माझे नाव लिहिले नसेल तर मला गोळी लागणार नाही. त्यानंतर ७१ च्या युद्धात काश्मीरमध्ये आणि आसाम, मणिपूरमध्ये उग्रवाद्यांविरुद्ध लढतानादेखील सहीसलामत राहिलो अन् आज निवृत्त होऊन–देखील १५ वर्षे झाली.

ब्रिगेडिअर (निवृत्त)
**अनिल तळवलकर, पुणे**
मो. ९६८९६४९३०२



# आडनावांची गंमत

नाव मोठे सहस्रबुद्धे
एक नंबरचे ढब्बोदे।
दुसरे आहेत शुभ्र गोरे
आडनाव मात्र यांचे काळे।
बारीक शरीराचे भिसे
हडप केले चार डोसे।
भस्म लावलेले अय्यर
राहणीसाहणीत नय्यर।
आडनाव यांचे दशपुत्रे
मुलंबाळंवंचित बिचारे।
दारावर पाटी 'गाढवे'
क्षणात सोडवी गणिते।
आडनाव मोठे वाघमारे
भिंतीवरच्या पालीला घाबरे।
गलेलठ्ठ आहेत डिसोझा
किती थोडे खातात बुवा।
नाव यांचे सत्यवान खरे
पक्के लबाड खोटारडे।
नीटनेटके पडबिद्री
बोलण्या–वागण्यात दळभद्री।
दारावर पाटी 'गोडबोले'
बोलणे मात्र तुया तुसडे।
श्रीमंत आहेत आमिर खान
भिकाऱ्यासारखे राहणीमान।
स्पष्ट हे बोलतात बरे
आडनाव मात्र तोतरे।
दारावर पाटी 'टकले'
केशवृद्धीचे देतात सल्ले।
आडनाव यांचे कडू
बोलण्यात गोड हळू।
नाव यांचे गुण्या रसाळ
बोलण्यात सारखी शिवीगाळ।
आडनाव यांचे लोखंडे
दुकान आहे सोन्याचांदीचे।
नावात–वागण्यात ही विसंगती
आहे ना गंमत आडनावांची।
शेक्सपिअर म्हणून गेले
नावात काय असते बरे।
खरेय् त्यांचे म्हणणे ते
माणसाचे कर्तृत्व हेच खरे।

**प्रदीप पु. सातवळेकर**
मो. ९८६९६८३३३५

*वसंतोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा*
श्री. अजित कारखानीस, कोल्हापूर – मो. ९८९००५०६०६


WWW.2FACTOR.IN
Promote Your Business
Acquire New Customers
Deepen Customer Relationship
BULK SMS
marketing
12% of facebook posts are read
29% of tweets are read
31% of emails are opened
98% of text messages are read
CHECKED 150 TIMES A DAY
The average person looks at their phone 150 times a day
MOBILE ADS
75% of people prefer receiving marketing messages via SMS
15% prefer receiving email ads
10% prefer in-app or push ads
2Factor, Solv Technologies,
19-02, B-Wing, Peninsula Business Park,
Lower Parel, Mumbai 400013
Solv Technologies
www.2Factor.in
95-5459-5459

# सुंदर सुविचारांचे संकलन

आमच्या लहानपणी शाळेमध्ये 'सामुदायिक जीवन' हा एक विषय होता. त्यामध्ये स्वच्छता, टापटीप, नीटनेटकेपणा, गोड बोलणे, नम्रता, चांगले विचार इत्यादी गोष्टी शिकवल्या जात. आता तोच विषय 'मूल्यशिक्षण' या नावाने शिकवला जातो. रोज फळ्यावर नवा सुविचार लिहिता यावा यासाठी सुंदर सुविचारांच्या संग्रहास सुरुवात झाली आणि त्याचे छंदात रूपांतर झाले व आजही तो छंद टिकून आहे.

प्रत्येक जण सर्वगुणसंपन्न नसतो. आपल्या वागण्यातून जास्तीत जास्त दोषांची वजाबाकी करून गुणांची बेरीज केल्यामुळे आपले जीवन प्रगल्भ होत असते. स्वतःच्या गुणांत काही अवगुण जाणणे, हीच गुणांची खरी पूर्णता असते. शरीर दागदागिन्यांनी कितीही सजवले, तरी खरे सौंदर्य म्हणजे आपल्यातील गुण. सौंदर्य म्हणजे सत्याच्या चेहऱ्यावरील हास्य. 'हास्य' हा असा अलंकार आहे की, जो कोणत्याही मुखकमलावर सुंदरच दिसतो. आनंदी वृत्ती व समाधान ही फार मोठी सौंदर्यवर्धक साधने आहेत. खऱ्या सौंदर्याला अलंकाराची गरज नसते, कारण आभूषणाचे ओझे कोमलता सहन करू शकत नाही. ओठांसाठीचे सौंदर्यप्रसाधन म्हणजे सत्य, आवाजासाठी मृदुता, डोळ्यांसाठी सहसंवेदना, हातांसाठी दान, हृदयासाठी प्रेम आणि आयुष्यासाठी नाते. सुंदर चेहऱ्याच्या जास्त प्रेमात पडू नका, कारण तो म्हातारपणी कोमेजणार आहे. सुंदर कांतीच्या प्रेमात पडू नका, कारण तिच्यावरही सुरकुत्या पडणार आहेत. प्रेमात पडायचंच असेल तर एका सुंदर, विश्वासू हृदयाच्या प्रेमात पडा; कारण ते तुम्हाला कधीही विसरणार नाही. सौंदर्याचा मापदंड हृदयापासून सुरू होतो आणि कर्तृत्वापाशी थबकतो– 'स्वतःला विशेष समजा'.

मृदुता सर्वांत बलवान असते आणि खरे बळ सर्वांत मृदू असते. शौर्य केवळ सिंहाच्या गर्जनेतच नाही, तर ते मुंगीच्या अथक परिश्रमातही असते. साध्या–साध्या गोष्टीही परिपूर्णपणे करण्याची चिकाटी ज्यांच्याकडे असते, त्यांनाच अवघड गोष्टीही सहजपणे करता येतात. नम्रता म्हणजे लवचिकता. त्यातच तणाव सहन करण्याची शक्ती आहे, जिंकण्याची कला आहे आणि शौर्याची पराकाष्ठा आहे. तुमची क्षमता तुम्हाला शिखरावर नेऊन ठेवते; पण तुम्ही तिथे टिकता ते तुमच्या चारित्र्याच्या बळावर. 'चारित्र्य' हे झाडासारखे असते आणि लौकिक त्याच्या सावलीसारखा. आपण नेहमी झाड विसरतो, सावलीचाच विचार करतो.

'मौनं सर्वार्थ साधनम्'। बोलावं कसं हे ठाऊक नसेल, तर गप्प बसणे केव्हाही चांगलेच; पण जगात मौनाइतका मोठा आवाज कशाचाच नाही. मौनात इतरांच्या शब्दांपेक्षा जास्त सामर्थ्य असते. बडबड कमी आणि कर्तव्य अधिक अशी माणसे जीवनात यशस्वी होतात. अमृतासारखी वाणी संजीवनीचे काम करते. मौन आणि हास्य ही दोन अस्त्रं आहेत– हास्य हे समस्या सोडवते आणि मौन हे समस्या टाळते. मणभर चर्चेपेक्षा कणभर सेवा अधिक मोलाची असते. माणसे मुळातच विचार–स्वातंत्र्याचा क्वचितच वापर करतात, पण त्या बदल्यात त्यांना उच्चारस्वातंत्र्य मात्र हवे असते. किती दुर्दैवाची गोष्ट आहे पाहा– डोळे झाकायला पापण्या आहेत, पण कान झाकायला काहीच नाही. मौनामध्ये इतके सारे सद्गुण असले तरी; व्यवहारी जगात बोलणाऱ्याची माती विकली जाते, न बोलणाऱ्याचे सोनेही विकले जात नाही– हे सत्य आहे. त्यामुळे माणसाने अतिप्रामाणिक, अतिसरळमार्गी असू नये; कारण जंगलात सरळसोट झाडेच आधी कापली जातात.

यश म्हणजे सर्वोत्तम कामगिरी करून शर्यत जिंकणे नव्हे, तर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून शर्यतीच्या अंतिम सीमारेषेला पार करणे. ज्या कामाचा आपण मोठ्या निष्ठेने पाठपुरावा करू, ते प्रत्येक काम मोठेच ठरते. जीवनातील सामान्य गोष्टीत तुम्ही असामान्य यश मिळवलेत, की जग तुमच्याकडे अभिमानाने पाहते. माणसे प्रेम करण्यासाठी असतात आणि वस्तू

वापरासाठी; पण आजच्या काळात माणसे वापरली जातात आणि वस्तूंवर प्रेम केले जाते. आपण स्वत:साठी जे करतो, ते स्वत:बरोबरच संपते; पण दुसऱ्यांसाठी जे करतो, ते चिरकाल टिकते. ज्याच्याकडे आंतरिक श्रीमंती असते, त्याला बाह्य जगातून फारशी कशाचीही गरज लागत नाही. हृदयाची श्रीमंती नसेल, तर कुबेरही भिकारीच नाही का! ज्याने जग जिंकले, त्याने मरताना सांगितले की, 'मला दफन करताना माझे हात उघडे ठेवा... म्हणजे जगाला कळेल की– ज्याने जग जिंकले, तो ते सोडून जाताना रिकाम्या हातानेच गेला.'

आपल्या कृतीतून वैयक्तिक स्वार्थ न जपता सार्वजनिक हित जपणे अगत्याचे असते. असे म्हणतात की– धनेश पक्ष्याची मादी आपल्या पिल्लाला वाढवताना स्वत:ची पिसे उतरवून ठेवते. घरसंस्था टिकवण्यासाठी एखादी गुणी स्त्री बाहेरचे महत्त्वाकांक्षी जग मिटून घेते. तिचे आयुष्य बासरीसारखे असते; म्हटले तर अनेक छिद्रे असलेली पोकळी, पण प्रयत्नाने तिच्यातूनच स्वर्गीय सूर निर्माण होतात. म्हणून ध्येय भव्य करा; जीवन आपोआप भव्य होईल. ते घडेल माणुसकीतून, त्यागातून, प्रेमातून आणि प्रार्थनेतून. सुविचारांमुळे जीवन सुसंस्कृत होते व सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो. भौतिक गोष्टींच्या फारसे प्रेमात न पडता आपण खऱ्या जीवनाकडे वळतो. सुविचारांची सांगड घालत लिहिलेल्या या लांबलचक लेखाला शेवटी एक छोटेसे टिंब द्यावेच लागेल.

***'सुविचारांचा सुंदर सहवास***
***करतो समृद्ध जीवनप्रवास'***

**सौ. अंजली प्रसाद पंडित**
मो. ९८६९५४८३५५



# पुन्हा भेटली झाशीची राणी

काळ मागं सरकला. सन १८५७ मधल्या जून महिन्यातील एके दिवशी काय घडलं, ते ऐकायला येऊ लागलं. झाशीच्या राणीचा राजवाडा... इंग्रजांविरुद्ध बंड पुकारण्याचा राणीचा निर्धार व्यक्त होऊ लागला. हे अवघं नाट्य बाजीराव रस्त्यावरील 'अक्षरधारा' बुक गॅलरीच्या कुसुमाग्रज वाचक कट्ट्यावर अभिवाचनातून प्रकट होऊ लागलं.

वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रजलिखित 'वीज म्हणाली धरतीला' या नाटकाच्या संपादित अंशाचा हा श्राव्यप्रयोग जागतिक महिलादिनाच्या निमित्तानं आयोजित करण्यात आला होता. दि. १३ मार्च १९७० रोजी पहिलावहिला प्रयोग झालेल्या या नाटकाचा ४६ वर्षांनंतर झालेला एक तास चाळीस मिनिटांचा हा बैठा प्रयोगही थरारक होता.

आकाशवाणी पुणे केंद्रावरील ज्येष्ठ निवेदिका अंजली लाळे या कार्यक्रमाच्या संकल्पक–दिग्दर्शक व राणीच्या मुख्य भूमिकेत होत्या. संज्ञा कुलकर्णी (जुलेखा), मधुरा शहाणे (मुंदर) व वैशाली कणसकर (काशी) यांनी राणीच्या सखीसेनेतील योद्धा स्त्रियांच्या भूमिकेत 'जान' ओतली. जया जुन्नरकर यांनी या नाटकाचा कणा असलेल्या संगीताची जबाबदारी सांभाळली. झुंजार, कणखर मनाच्या राणीचं संवेदनशील रूप, सहकारिणींविषयीचा जिव्हाळा, प्रजेबद्दलचा कळवळा, फितुरी पाहून खंतावणं, सारं बळ एकवटून इंग्रजांशी झुंज घेणं आणि अखेर धारातीर्थी पडणं... आदी सारं स्वरांच्या भावपूर्ण चढ–उतारांतून खुलत गेलं. 'स्मरशील गोकुळ सारे', 'चार होत्या पक्षिणी त्या' व शेवटचं 'अलविदा हो अलविदा' हे गीत वातावरण भावुक करून गेलं. राणीनं अखेरची केलेली मसलत व मृत्यूचा प्रसंग ऐकताना मनात कालवाकालव होत होती. समारोपासाठी वापरलेले शिवरंजनी रागातील बासरीचे सूर वातावरण हळवं करत होते.

हे भावपूर्ण अभिवाचन काव्यमय भाषेच्या माध्यमातून फुलत राहिलं. बालसाहित्यकार राजीव तांबे व 'अक्षरधारा'च्या रसिका राठिवडेकर या वेळी उपस्थित होत्या.

***वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा***
**सौ. शुभांगी आनंद खंडकर, कोल्हापूर – मो. ९३७२४३८१८८**

# संस्थावृत्त कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे (गुजरात)

बडोदे शहरात कऱ्हाडे ब्राह्मण संघ इ.स. १९७० पासून अस्तित्वात आहे. विविध प्रकारचे सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रम संघातर्फे राबविले जात असतात.

इ.स. २०१६-१७ च्या वर्षात नवी कार्यकारिणी समिती कार्यभार सांभाळत आहे. संघाची मालकीची वास्तू लवकरात लवकर उभी करणे, हे या समितीचे मोठे स्वप्न आहे. श्री. नीळकंठ वा. मुळ्ये हे अध्यक्षस्थानी काम करणाऱ्या त्यांच्या समितीने हे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलायचे ठरविले. ते म्हणजे, या स्वप्नपूर्तीसाठी एक भव्य संगीत रजनीचा कार्यक्रम बडोद्यात करण्याचे ठरविले.

रविवार, दि. २२-१-२०१७ या दिवशी हे आयोजन प्रत्यक्षात उतरले आणि गांधीनगर गृहच्या मंचावर एक भव्य आणि देखणी 'संगीत रजनी' सादर करण्यात आली.

संघाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमासाठी दोन मान्यवर अतिथी सौभाग्याने लाभले होते. प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती सुहासिनी देशपांडे (पुणे) या सुप्रसिद्ध अशा सिने-नाट्य अभिनेत्री उपस्थित होत्या. या क्षेत्रातील त्यांची प्रदीर्घ व यशस्वी कारकीर्द व अभिनय-कौशल्य यामुळे कार्यक्रमाला अत्यंत गौरवशाली स्वरूप प्राप्त झाले. त्यांनी आपल्या वक्तव्याऐवजी आपल्या नाटकातील एक छोटा प्रसंग सादर करून आपल्या दमदार अभिनय झलक दाखवली.

दुसरे सन्माननीय अतिथी-विशेष श्री. शेखर नाफडे, सुप्रीम कोर्टाचे ज्येष्ठ व नामवंत ॲडव्होकेट यांच्या उपस्थितीने कलेबरोबरच ज्ञानमूर्तीचे अधिष्ठान लाभले. त्यांच्या विनयशील परंतु नेमक्या भाषणाने श्रोतृवर्गाला प्रभावित केले.

दीपप्रज्वलनानंतर श्री. नीळकंठ वा. मुळ्ये यांनी आपल्या स्वागतपर भाषणात मान्यवरांचे व उपस्थित रसिकांचे स्वागत केले आणि अल्प शब्दांत संस्थेच्या कार्यप्रणालीचे विवेचन केले. यानंतर सूत्रसंचालिका सौ. अनुश्री पंडित यांनी दोघाही मान्यवर अतिथींचा साक्षेपाने परिचय करून दिला आणि अध्यक्षांच्या हस्ते सन्माननीय पाहुण्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.

असा छानदार आरंभ होऊन, प्रत्यक्ष 'संगीत रजनी'ला सुरुवात होण्यापूर्वी एक लहानगी पण गुणी नृत्यांगना कुमारी आर्या पंडित हिने कृष्णस्तवनपर सुंदर नृत्य सादर केले.

आता मुख्य कार्यक्रमाचे संपूर्ण सूत्र-संचालन निवेदिता थोरात यांनी उत्तम प्रकारे सांभाळले. या 'संगीत रजनी'ची संपूर्ण जबाबदारी बडोद्यातील नामवंत सुरेल गायिका सौ. सुप्रिया आंबेकर यांनी घेतली होती. त्या स्वत: अनेक वर्षांपासून चित्रपट संगीताचे कार्यक्रम आपल्या वाद्यवृंदासह उत्कृष्टरीत्या सादर करीत आहेत. अन्य सहकलाकारांच्या बरोबर एकापेक्षा एक वरचढ आणि लोकप्रिय चित्रपटगीते व काही मराठी गीते सादर करून सुप्रियाताईंनी रसिक श्रोत्यांची मने जिंकून घेतली. सन १९६० ते ८० च्या दशकांमधली सुंदर गाणी दीर्घ काळानंतर ऐकायला मिळाल्यामुळे प्रत्येक गाण्याला टाळ्यांचा पाऊस पडत होता आणि कार्यक्रमाची रंगत शेवटपर्यंत वाढत गेली.

शेवटी आभारप्रदर्शन व राष्ट्रगीत होऊन कार्यक्रमाची सांगता झाली व ही बहारदार 'संगीत रजनी' बडोदेकरांसाठी संस्मरणीय ठरली.

**श्रीमती रोहिणी खांडेकर**
सहकार्यवाह
मो. ०९४२७३१६९५२

## सुभाषितांचा खजिना

**। गौरवं प्राप्यते दानात् न तु वित्तस्य संचयात्।**

**स्थिति: उच्चै: पयोदानां पयोधीनां अध:।**

No Glory in accumulating but only in giving. See how the clouds that give rain, are roaring from high above, while the sea that only collects is seated at the bottom!

वसंतोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्री. आनंद खंडकर, कोल्हापूर - मो. ९८५००८८८७४

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, बडोदे - तिळगूळ समारंभ

रविवार, दि. २९ जानेवारी २०१७ या दिवशी प्रतिवर्षाप्रमाणे 'तिळगूळ समारंभ' साजरा करण्यात आला.

संघाचे अध्यक्ष श्री. नीळकंठ वा. मुळ्ये यांनी अतिथी विशेष श्री. सुनील करकरे, खास निमंत्रित पाहुण्या सौ. सोनाली पोत्रेकर व सर्व सभासद बंधू-भगिनींचे स्वागत केले.

सौ. अनुश्री पंडित यांनी कार्यक्रमाचे संचालन हाती घेतानाच दोघाही मान्यवर पाहुण्यांचे परिचय करून दिले. 'तिळगूळ घ्या व गोड बोला' असे म्हणतच उपस्थितांचे स्वागत केले. याच वेळी अन्य भगिनींनी उपस्थित महिला सभासदांमध्ये हळदी-कुंकू, तिळगूळ व भेटवस्तू वितरित केल्या. अन्य सर्व सभासदांना तिळगूळ देऊन कार्यक्रमाला गोडव्याने सुरुवात झाली.

सौ. सोनाली पोत्रेकर यांनी संक्रांतीचे, तिळगुळाचे शास्त्रीय महत्त्व व त्यातील अर्थ विशद करून सांगितला. श्री. सुनील करकरे, हे अनेक ज्ञानशाखांमध्ये विद्यादानाचे पवित्र कार्य करीत असल्याने अत्यंत व्यग्र दिनचर्या असूनही मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मदतरूप असे समुपदेशनही करीत असतात. आपल्या वक्तव्यात त्यांनी नेमकेपणाने आपल्या कार्याचा परिचय करून दिला.

यानंतर या कार्यक्रमातला मुख्य भाग म्हणजे, यशस्वी विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक वितरण. दर वर्षी संघाकडून 'कौतुक समारंभ' केला जातो. के.जी. ते इयत्ता ९ वीपर्यंत कोणत्याही माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके दिली गेली. या पारितोषिकांचे प्रायोजक श्री. नीळकंठ वा मुळ्ये (अध्यक्ष) हे असतात. इ. १० ते १२ वी, महाविद्यालयीन विद्यार्थी व अन्य विशेष कौशल्ये दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक संघातर्फे रोख बक्षिसे देऊन केले गेले. आपल्या सभासदांच्या अपत्यांचे कौतुक करून त्यांना शिक्षणात प्रोत्साहन देणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे, अशी संघाची भावना आहे. सन्माननीय अतिथींच्या हस्ते पारितोषिक वितरण पार पडले.

उपस्थित सभासदांना अल्पोपाहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**श्रीमती रोहिणी खांडेकर,** सहकार्यवाह
मो. ०९४२७३१६९५२

# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणे - तिळगूळ समारंभ २०१७

या वर्षीचा तिळगुळ समारंभ मकर संक्रान्तीच्या दिवशीच, म्हणजे रविवार, १४ जानेवारी २०१७ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता हत्ती गणपतीजवळील *दुर्वांकुर हॉल, टिळक रोड येथे संपन्न झाला. सुरुवातीस ब्रिगेडियर अनिल तळवलकर (सेवानिवृत्त)- सेना मंडल विभूषित यांचा परिचय श्री. मकरंद फणसळकर यांनी करून दिला. त्यानंतर 'सर्जिकल स्ट्राईक' या विषयावर, ब्रिगेडियर अनिल तळवलकर (सेवा-निवृत्त)- सेना मंडल विभूषित यांचा दृक्-श्राव्य सादरीकरणाचा कार्यक्रम झाला. प्रथम सर्जिकल स्ट्राईक म्हणजे काय, हे त्यांनी विशद करून सांगितले. त्यासाठी लागणारे कमांडोज व त्यांचे प्रशिक्षण यावर त्यांनी विस्तृत माहिती दिली. कमांडोजना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणात जेथे सर्जिकल स्ट्राईक करावयाचा आहे तेथील स्थानिक भाषा, वेशांतर, स्थानिक लोकांचा अभ्यास याविषयीचे महत्त्व सांगितले. तसेच निरनिराळ्या शस्त्रांचा अभ्यास व वापर ह्याचे महत्त्व सांगितले. नावीन्यपूर्ण अशा दीड तास रंगलेल्या ह्या कार्यक्रमाचे उपस्थितांनी खूप कौतुक केले.

माजी नगरसेवक व हत्ती गणपती मंडळाचे अध्यक्ष श्री. श्याम मानकर यांचा परिचय सौ मुक्ता चांदोरकर यांनी करून दिला. नंतर ब्रि. अनिल तळवलकर व माननीय श्याम मानकर यांचा सत्कार संघाचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. ज्या सभासदांनी ३१ डिसेंबर २०१६ रोजी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेली आहेत, अशा सर्व उपस्थितांचा सत्कार ब्रि. अनिल तळवलकर, मा. श्याम मानकर व श्री. लक्ष्मीकांत देसाई यांच्या हस्ते करण्यात आला.

शेवटी श्री. सुहास खानवलकर यांनी पसायदान म्हटले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मुक्ता चांदोरकर यांनी केले. विश्वस्त मंडळाचे सर्व सभासद व इतर सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. माननीय श्याम मानकर यांचे विशेष आभार. भोजनोत्तर कार्यक्रम संपला.

**सुहास खानवलकर, पुणे**
मो. ९४०३९२८५२०

# कऱ्हाडे ब्राह्मण सेवा मंडळ, डोंबिवली




दर वर्षी आम्ही संक्रात संमेलन फारच उत्साहाने साजरे करतो. ४–५ तासांचा कार्यक्रम असतो. या कालावधीमध्ये कार्यक्रमांची अगदी रेलचेल असते.

यंदाचा कार्यक्रम तारीख २२ जानेवारी २०१७ रोजी संपन्न झाला. नेहमीप्रमाणे कार्यक्रम भरगच्च होता.

ईशस्तवन, स्वागतगीत, प्रास्ताविक असे कार्यक्रम झाले आणि सत्कारमूर्तींच्या परिचयानंतर मुख्य कार्यक्रमाला सुरवात झाली.

कार्यक्रमात वेदमूर्ती श्री. सिद्धेश विद्याधर मुंडले यांचा सत्कार, डोंबिवलीतील प्रसिद्ध उद्योगपती श्री. श्रीधर श्रीपाद नाख्ये यांचा सत्कार, तसेच सिमेन्स इंडियासारख्या प्रसिद्ध कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंटसारखे महत्त्वाचे पद भूषविणारे श्री. नितीन द. आठल्ये, सामाजिक कार्यकर्ते श्री. सुरेशराव ना. फाटक, तसेच शहरातील ख्यातनाम सी.ए. श्री. सुहास सु. आंबेकर यांचा सत्कार आणी सर्वात महत्त्वाचा सत्कार श्रीमती उर्मिला ज. प्रभुघाटे, अध्यक्ष– कांचनगौरी महिला पतपेढी यांचा. या पतपेढीच्या निवडणुकीत उर्मिलाताई ४–५ वेळा तरी बिनविरोध निवडून आल्या आहेत. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या कष्टामुळेच त्यांच्या पतपेढीला पुष्कळ वेळा ऑडिटरांनी ए ग्रेड दिली आहे.

महासंघाने कळविल्याप्रमाणे दि. १९ नोव्हेंबर हा दिवस झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करायचा; पण ज्या संघांना त्या दिवशी जमणार नाही, त्यांनी नंतर करावा– या महासंघाच्या निर्णयाने आम्ही शेजारच्या शाळेतील तीन विद्यार्थिनींचा सत्कार केला. तीनपैकी एक विद्यार्थिनी वक्तृत्वस्पर्धात पहिली, दुसरी खेळामध्ये पहिली व तिसरी उत्तेजनार्थ अशी तीन बक्षिसे प्रदान केली.

झाशीच्या राणीवर साधारण १९५५/५६ च्या दरम्यान अभ्यासाला एक कविता होती. ती तालसुरात म्हणून आम्हा सर्वांना शाळेतील दिवसांची आठवण करून दिली.

'रे हिंद बांधवा थांब या स्थळी अश्रू दोन ढाळी, ही पराक्रमाची ज्योत सांगते इथे झाशीवाली...

'तांबे कुलवीरश्रीची, नेवाळकरांची प्रीती, हिंद भू ध्वजा, जणू जळती मर्दानी राणी लक्षीबाई धूर्त महाकाली, ही पराक्रमाची ज्योत मावळे इथे झाशीवाली...'


एक स्फूर्तिदायक गाणे ऐकून कान तृप्त झाले.

नंतर सत्कारमूर्तींचे, तसेच प्रमुख पाहुण्यांचे मनोगत झाले.

मध्यंतरानंतर मूळ संस्कृत नाटकाचा मराठीतील केलेला स्टडअपशो झाला. आपण सर्व–जण नेहमी गुणगुणत असलेल्या खास खास गाण्याचे सादरीकरण झाले. रजनीनाथ हा नभी उगवला, माडीवरी चल ग सये, तेचि पुरुष दैवाचे यांसारख्या सुमधूर गाण्यांनी रात्रीचे साडेनऊ कधी वाजले ते कळालेच नाही. जवळजवळ प्रत्येक गाण्याला once.more मिळविणाऱ्या कार्यक्रमाचे सूत्रधार डॉ. प्रसाद भिडे, गायक शुभम जोशी, संवादिनीवर श्री. सुधांशु घारपुरे व तबल्यावर श्री. गंधार जोग या सर्व मंडळींनी कार्यक्रमाला उंचीवर नेले आणि आम्हा सर्वांना वाटू लागले की, असे कार्यक्रम नेहमी व्हावेत.

**श्री. वासुदेव नारायण रायकर, डोंबिवली**

मो. ७७३८४५५५८८



# कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबई – जागतिक महिलादिन



राष्ट्रपती पदक व शिवछत्रपती पुरस्कारविजेत्या श्रीमती नेहा पावसकर यांना 'कऱ्हाडे प्रतिष्ठा' पुरस्कार देताना प्रो.डॉ.अनुराधाताई पोतदार–जव्हेरी, नगरसेविका मुंबई महानगरपालिका.

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या महिला शाखेतर्फे शनिवार, दिनाक ११ मार्च २०१७ रोजी महिलादिन साजरा करण्यात आला. चंद्रेश्वर हॉल, गिरगाव येथे संपन्न झालेल्या या समारंभात मुंबई महापालिकेच्या माजी उपमहापौर व विद्यमान स्थायी समिती सदस्य श्रीमती अलकाताई केरकर तसेच विद्यमान महापालिका नगरसेविका प्रो. डॉ. अनुराधाताई पोतदार–झवेरी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

प्रमुख अतिथींच्या हस्ते गणेशपूजन व दीपप्रज्वलन करून समारंभाची सुरुवात करण्यात आली. कऱ्हाडे ब्राह्मण संघाच्या कार्याची ओळख श्रीमती अलका डोंगरे यांनी करून दिल्यावर महिलादिनाची माहिती श्रीमती अंजली धोपेश्वरकर यांनी उपस्थितांना दिली. प्रो. डॉ. अनुराधाताई तसेच श्रीमती अलकाताई या नगरसेविका म्हणून निवडून आल्याबद्दल संघाच्या वतीने श्रीमती अलका डोंगरे व सेंसॉर समितीच्या सदस्या श्रीमती शिल्पाताई गणपत्ये यांनी शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सन्मान केला. संघाच्या वतीने दर वर्षी महिलादिनाचे औचित्य साधून समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांना त्यांच्या त्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठा सन्मानाने गौरविण्यात येते.

या वर्षी संघाच्या वतीने राष्ट्रपतीपदक तसेच शिवछत्रपती सन्मान विजेत्या अंध खेळाडू नेहा पावसकर, रणजीपटू वृषाली भगत, पत्रकार पूजा दामले, ज्योत्स्ना गाडगीळ, कीर्तनकार गुणिला मोघे, स्वधा खंडकर तसेच पौरोहित्यकारा स्वप्नगंधा जोशी, सुरेखा पटवर्धन आणि रुग्णसेविका ललिता मराठे अशा विविध क्षेत्रांतील महिलांचा प्रतिष्ठा सन्मानाने प्रमुख अतिथींच्या हस्ते गौरव करण्यात आला.

सन्मानित महिलांची ओळख संघाच्या कार्यकर्त्या श्रीमती शुभांगी टेम्ब्ये, वृषाली पित्रे, गौरी हर्डीकर, वृषाली तळेकर तसेच अमृता किर्लोस्कर, भाग्यश्री सरपोतदार यांनी करून दिली. प्रो. डॉ. अनुराधाताईंनी सन्मानाला उत्तर देताना 'महिलांनी स्वतःसाठी स्पेस ठेवण्याचा तसेच मनाला पटणाऱ्या गोष्टी ठामपणे करण्याचा व न पटणाऱ्या गोष्टींना स्पष्टपणे नाकारण्याचा' सल्ला दिला. आज आज स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नाही याचाही दाखला देऊन त्यांनी स्त्रीशक्तीचा गौरव केला.

गप्पा–टप्पा या कार्यक्रमाचे सूत्र – संचालन करताना श्रीमती अंजली आंबर्डेकर यांनी आपल्या खुमासदार शैलीत सर्वच सन्मानित महिलांना बोलके केले. या कार्यक्रमात सर्वच सन्मानितांनी आपले अनुभव व आपण कसे घडलो याची माहिती हसत–खेळत दिली. या कार्यक्रमाचे उपस्थितांनी कौतुक करून अंजलीताईंना दाद दिली.

संघाच्या कार्यकारिणी सदस्या श्रीमती आदिती तांबे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मदत केलेल्या सर्वांचे आभार मानले. संघाच्या कार्यकर्त्या श्रीमती पूर्वा सप्रे यांनी अल्पोपाहाराची व्यवस्था सांभाळली होती.

या सुनियोजित कार्यक्रमाचे आयोजन संघाच्या कार्यकारिणी सदस्या श्रीमती भाग्यश्री सरपोतदार यांनी केले होते.

**विजय आंबर्डेकर**
कार्याध्यक्ष
मो. ९८१९८८५६६५

# उन्हामुळे मृत्यू का होतो ?

आपण सगळेच उन्हात फिरतो. पण काही जणांचाच उन्हात गेल्यामुळे अचानक मृत्यू का होतो ?

- आपल्या शरीराचं तापमान नेहमी ३७ अंश सेल्सियस असतं, या तापमानातच शरीरातले सर्व अवयव नीट काम करू शकतात
- घामाच्या रूपाने पाणी बाहेर काढून शरीर ३७ अंश सेल्सियस तापमान कायम राखतं, सतत घाम निघत असताना पाणी पीत राहाणं अत्यंत गरजेचं आणि अत्यावश्यक आहे.
- पाणी शरीरात इतरही अधिक महत्त्वाची कामं करतं, त्यामुळे शरीरातला पाण्याचा साठा कमी झाला, तर शरीर घामाच्या रूपाने पाणी बाहेर टाकणं टाळतं.
- जेव्हा बाहेरचं तापमान ४५ अंशाच्या पुढे जातं आणि शरीरातली कूलिंग व्यवस्था पाण्याच्या अभावाने ठप्प होते, तेव्हा शरीराचं तापमान ३७ अंशाच्या पुढे जाऊ लागतं.
- शरीराचं तापमान जेव्हा ४२ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचतं, तेव्हा रक्त तापू लागतं आणि रक्तातलं प्रोटिन अक्षरशः शिजू लागतं (उकळत्या पाण्यात अंड उकडतं तसं!)
- स्नायू कडक होऊ लागतात, त्यात श्वास घेण्यासाठी लागणारे स्नायूही निकामी होतात.
- रक्तातलं पाणी कमी झाल्यामुळे रक्त घट्ट होतं, ब्लडप्रेशर अत्यंत कमी होतं, महत्त्वाच्या अवयवांना (विशेषतः मेंदूला) रक्त पुरवठा थांबतो.
- माणूस कोमात जातो आणि त्याचे एक-एक अवयव अवघ्या काही क्षणांत बंद पडतात आणि त्याचा मृत्यू ओढवतो.
- उन्हाळ्यात असे अनर्थ टाळण्यासाठी सतत थोडे थोडे पाणी पित रहावे व आपल्या शरीराचे तापमान ३७ अंशच कसे राहील याकडे लक्ष द्यावे.

| | | | |
|---|---|---|---|
| सफरचंद - थंड | गाजर - थंड | अननस - उष्ण | अक्रोड / खजूर - उष्ण |
| चिकू- थंड | मिरची - उष्ण | डाळींब - थंड | हळद - उष्ण |
| संत्री- उष्ण | मका - उष्ण | ऊस - उष्ण | कॉफी - थंड |
| लिंबू - उष्ण | मेथी - उष्ण | मीठ - थंड | दूध / दही / तूप / ताक / |
| कांदा- थंड | वांगे - उष्ण | मूग डाळ - थंड | तांदूळ - थंड |
| बटाटा- उष्ण | भेंडी - उष्ण | चणा डाळ - उष्ण | उन्हाळ्यात थंड पदार्थ जास्त खाल्ल्यास |
| पालक- थंड | बीट - थंड | गुळ - उष्ण | होणारा त्रास कमी होतो. |
| टॉमेटो- उष्ण | बडीशेप - थंड | तिळ - उष्ण | |
| कारले- उष्ण | वेलची - थंड | शेंगदाणे / बदाम / काजू / | |
| कोबी- थंड | पपई - उष्ण | | |

आयुर्वेदातून संकलन
संपादक

*वसंतोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा*
श्री. विजय आंबर्डेकर, मुंबई - मो. ९८१९८८५६६५

रुचकर पाककृती

चटक – मटक – चटणी – चटक ...


## गाजराचे खमंग वडे

**साहित्य :**

एक वाटी गाजराचा कीस, अर्धी वाटी मुगाची डाळ, अर्धी वाटी चण्याची डाळ, ५–६ लसूण पाकळ्या, एक मूठ बारीक चिरलेली कोथिंबीर, आल्याचा एक लहानसा तुकडा, अर्धी वाटी खोवलेले ओले खोबरे, दोन ओल्या मिरच्या, बेताचे मीठ, अर्धा चमचा साखर, हिंग–हळद–जिरे प्रत्येकी अर्धा चमचा, मोहनासाठी अर्धा डाव तेल, दोन चमचे चण्याचे पीठ, एक चमचा सफेद भाजलेले तीळ व वडे तळण्यासाठी तेल, थोडी हळद.

**कृती :**

प्रथम चण्याची व मुगाची डाळ गरम पाण्यात तीन ते चार तास भिजत घालावी. दोन्ही डाळी पाणी काढून मिक्सरमध्ये जाडसर दळून घ्याव्यात. आल्याचा तुकडा, मिरची त्यात वाटून नंतर खोबरे, हळद, मीठ, साखर, तीळ, कोथिंबीर, जिरे, चण्याचे पीठ घालावे. एक डाव गरम तेलाचे मोहन घालून सर्व पदार्थ चांगले चुरावेत आणि नंतर गाजराचा कीस त्यात घालावा. सर्व वस्तूचा गोळा झाला पाहिजे. नंतर त्याचे लहान–लहान गोळे करून बत्ताशाप्रमाणे चपटा आकार तळहाताने दाबून द्यावा. हे वडे करून थाळ्यात ठेवावेत. आयत्या वेळी तळून द्यावेत. सॉस व नारळाच्या चटणीच्या मिश्रणाशी हे वडे खायला द्यावेत. छान लागतील.



**व्हेज ट्रीट**
**कमला कळके**

## भावपूर्ण श्रद्धांजली

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचे माजी अध्यक्ष डॉ. माधव नारायण शहाणे यांचे १७ फेब्रुवारी २०१७ रोजी दुःखद निधन झाले.

डॉ. माधव नारायण शहाणे इ. स. १९७५ ते २००० पर्यंत कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईचे अध्यक्ष होते. २५ वर्षे अखंडपणे कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे अध्यक्षपद भूषविणारी ही पहिली व्यक्ती होती. बाणेदार, परखड पण अत्यंत विनम्र असा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीत संघासाठी अनेक कार्यकर्ते त्यांनी तयार केले. सर्व ज्ञातिबांधवांशी अत्यंत सलोख्याचे संबंध ठेवून त्यांना एकत्र आणण्याची कला त्यांना अवगत होती.

डॉक्टर म्हणून त्यांनी व्यवसायाकडे कधीही पाहिले नाही, तर सेवा म्हणून त्याचा उपयोग केला. कऱ्हाडे ब्राह्मण संघ, मुंबईच्या प्रगतीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे. आज त्यांच्या जाण्याने कऱ्हाडे ब्राह्मणांचा तसेच मुंबई संघाचा मोठा मार्गदर्शक आपण गमावला आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

***वसंतोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा***
**श्री. गणेश गुर्जर, पुणे – मो. ९८९०९९०११३**


पितांबरी
दीप शक्ती
तीळ तेलाच्या गुणांनी युक्त
दिव्याचे तेल
Deep shakti
Power of Spirituality!
Not for Edible Use
देई शांत प्रकाश व सात्त्विकता
• काजळी धरत नाही.
• ज्योत बराच वेळ शांतपणे तेवते.
• सात्त्विकता वाढवते
१५ किलो, १ लि., ५०० व २०० मिली.
मध्ये उपलब्ध
पितांबरी
देवभक्ती
अगरबत्ती
4 in 1
नक्षत्र सिरिज अश्विनी
नक्षत्र सिरिज रोहिणी
नक्षत्र सिरिज रेवती
नक्षत्र सिरिज कृत्तिका
फुलांचा 'नैसर्गिक' सुगंध
जो देई आनंद!
Made With NATURAL Extract
From Pitambari Dapoli Farms
22, 100 ग्रॅम,
4 in 1 & 7 in 1
मध्ये उपलब्ध
Pitambari Products Pvt. Ltd.
Thane: 022 - 6703 5555, Pune: (020) 2539 0734, 9921001222, CRM No.: 022-6703 5564, 5699
Toll Free: 180030701044 | CIN : U24239MH1989PTC051314 | www.pitambari.com


# 'ब्राह्मणभूषण'ने उद्योजकतेचा गौरव



'आम्ही सारे ब्राह्मण' पाक्षिकाच्या वतीने प्रदान केला जाणारा 'ब्राह्मणभूषण पुरस्कार' श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांना पुण्यात १८ मार्च रोजी एका विशेष समारंभात पुण्याच्या नवनिर्वाचित महिला महापौर सौ. मुक्ता टिळक यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याबद्दलच्या विशेष मुलाखतीत श्री. रवींद्र प्रभुदेसाई आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, ''उद्योजक हा राजा असतो. त्यामुळे ब्राह्मण समाजातील युवकांनी परदेशात जाऊन नोकरी करण्यापेक्षा येथेच स्वतंत्र उद्योगाची उभारणी करावी. मात्र, त्यासाठी स्वातंत्र्यवादी वृत्ती सोडण्याची मानसिकता हवी'', असे रोखठोक प्रतिपादन पितांबरी उद्योगसमूहाचे संस्थापक-अध्यक्ष श्री. रवींद्र प्रभुदेसाई यांनी केले आहे.

उद्योजकतेची मानसिकता, ब्राह्मण संघटनांची भूमिका, शालेय अभ्यासक्रमात उद्योजकतेच्या विषयाचा समावेश, ब्राह्मण व्यावसायिक परिषदेचे आयोजन, कौशल्यविकास प्रशिक्षण अशा विविध विषयांवर श्री. प्रभुदेसाई यांनी दिलखुलासपणे मते मांडली आणि उद्योजकीय मानसिकता वाढण्यासाठी आग्रह केला.

सुरक्षित नोकरी, आत्मकेंद्रित मानसिकता, आहे त्यामध्ये समाधान मानण्याची भूमिका ब्राह्मण समाजाने सोडायला हवी, असे नमूद करून ते म्हणाले की, परदेशात नोकरीसाठी जाण्याचा अट्टहास कशासाठी; आपण येथेच उद्योग-व्यवसाय का करीत नाही, यांसारख्या प्रश्नांची आपणच उत्तरे शोधली पाहिजेत. एक उद्योग उभा राहिला की, त्याबरोबर अनेक लघुउद्योगांना चालना मिळते. रोजगारांच्या संधी निर्माण होतात. त्यातून बेकारीचे प्रमाण कमी होईल. मुख्य म्हणजे उद्योजकता वाढीस लागणार आहे. एक बाब प्रकर्षाने मांडायला हवी- ती म्हणजे, सध्याच्या स्थितीत विविध ब्राह्मण संघटना कार्यरत आहेत, ते निश्चितच स्वागतार्ह आहे; पण काळाची गरज ओळखून संघटनांनी स्वतंत्र उद्योग आघाडी सुरू करावी. त्या माध्यमातून प्रशिक्षणाची, कौशल्यविकास प्रशिक्षणाची संधी युवकांना उपलब्ध करून द्यावी. या उपक्रमासाठी जी तांत्रिक अथवा अभ्यासक्रमाची गरज लागेल, ती देण्यास उद्योजक तयार आहेत. असा उपक्रम सध्या सुरू असला तरी त्याची व्याप्ती वाढणे आवश्यक आहे. अनेक उद्योगांचा अभ्यास दौरा, चर्चासत्रे, उद्योगविषयक प्रदर्शनांचे आयोजन झाले; तर उद्योजकीय चळवळ अधिक विस्तारण्यास मदत होईल.



पाक्षिक

॥ आम्ही सारे ब्राह्मण ॥

EKVIRA PUBLICITY

एकत्र येऊ...प्रगती करू!

मानपत्र

ब्राह्मण भूषण पुरस्कार २०१७

संस्कारित उद्योगाचा वटवृक्ष

श्री. रविंद्र प्रभुदेसाई

जीवनात एक वेगळी वाट निवडली, त्या वाटेवरून जाताना अनेक स्पीडब्रेकर मधे आले, आव्हाने उभी राहिली; पण न डगमगता, विचलित न होता, मनाशी बाळगलेले स्वप्न प्रत्यक्षात आणले. संस्कार आणि उद्योग यांचा सुंदर मिलाफ घडवून आणणारे ध्येयवादी उद्योजक म्हणून पितांबरी उद्योगसमूहाचे संस्थापक- अध्यक्ष श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांचा आवर्जून उल्लेख करावाच लागेल. संस्कारित उद्योगाचा वटवृक्ष उभा करणारे उद्योजक श्री. रविंद्र प्रभुदेसाई यांना आज 'ब्राह्मण भूषण पुरस्कार' प्रदान करताना आम्हास विशेष आनंद होतो आहे.

'माणसाला चमकायचं असेल तर त्यासाठी स्वतःचा प्रकाश आणि झळकायचं असेल, तर स्वतःचे तेज निर्माण करता आले पाहिजे,' हीच खूणगाठ मनाशी बांधून प्रतिकूल स्थितीमधूनही आपण अनुकूलतेची वाट शोधून काढली. लहानपणी जे स्वप्न उराशी बाळगले होते, ते स्वकर्तृत्वाच्या जोरावर प्रत्यक्षात आणले. तसे पाहिले तर घरची सांपत्तिक स्थिती बेताची. उद्योगक्षेत्राची पार्श्वभूमी नाही. प्रतिकूलता, उपेक्षा, अपमान यांनीसुद्धा वाटचालीत सोबत केली.

नोकरी करावी, असे मनाने कधीच स्वीकारले नाही. उद्योगाच्या क्षेत्रातच पाय रोवायचे अशी खूणगाठ मनाशी बांधली असली तरी त्यासाठीचे शिक्षण, अनुभव यांची वानवाच होती. डोंबिवलीतील एक आजारी उद्योग आपण चालवायला घेतला खरा, पण नुकसान पदरात घेऊन उद्योगच बंद झाला. उद्योगाच्या क्षेत्रातले आपले हे पहिलेच पाऊल अपयशी ठरले तरी एका अर्थाने आगामी यशस्वी वाटचालीची ती पाऊलवाट ठरली.

व्यवसाय व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम, बाजारपेठेचे ज्ञान, व्यवसायाचे नियोजन, गुणवत्ता नियंत्रण, व्यवसायाच्या उभारणीची उमेद यांच्या एकत्रित बांधणीतून पहिलेवहिले उत्पादन आपण ग्राहकांच्या हाती दिले, ते म्हणजे कॉपशाईन पावडरचे! आणि स्वतंत्र उद्योग-व्यवसायाची पायाभरणी झाली. त्यानंतर आपणास मागे वळून पाहण्याची वेळच आली नाही. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशाच्या विविध राज्यांत आणि परदेशांतील बाजारपेठेत आपल्या उत्पादनांनी स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. इंग्रजीत एक वाक्य आहे, त्याची आठवण प्रकर्षाने होते ते म्हणजे, 'वन इव्हेंट अँड मेनी डायमेन्शन्स'. त्याचा प्रत्यय पितांबरी उद्योगसमूहामध्ये अनुभवास येतो. त्याचे कारण म्हणजे, उत्पादनांचा प्रवास हा कोणत्याही घरातील देवघर ते स्वयंपाकघर असाच आहे. एका अर्थाने सर्वसामान्य गृहिणींना दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरतील, अशी ही उत्पादने आहेत. हे आपल्या उद्योगसमूहाचे वेगळेपण आहे. विविध सुगंधांच्या उदबत्ती, कॉपशाईन पावडर, वेदनाशामक आयुर्वेदिक तेल, अशा अनेकविध उत्पादनांचा उल्लेख करावा लागणार आहे. आपणावर लहानपणापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार आहेत. आपल्या उद्योग-व्यवसायामध्ये त्याचे प्रतिबिंब पाहावयास मिळत आहे. एका अर्थाने उद्योग-व्यवसायाची मूलतत्त्वे आणि संस्कारित मानसिकता याचा संगमच झाला आहे. त्यामुळे या उद्योगसमूहास एक प्रकारचे अधिष्ठान प्राप्त झाले, असे म्हणता येईल. परिणामी, संस्कारित उद्योगाचा वटवृक्ष उभा करण्यात आपण यशस्वी झाला आहात, असे अभिमानाने म्हणावेसे वाटते! ब्राह्मण संस्था व ब्राह्मण कुटुंबांकरिता तसेच विविध सामाजिक संस्थांसाठी आपण देत असलेले भरीव योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे!

यापुढील काळातही आपल्या उद्योग-व्यवसायाची आणि आपली उत्तरोत्तर प्रगती होत राहावी, यासाठी आम्हा सर्वांच्या शुभेच्छा! आपण या पुरस्काराचा स्वीकार करावा, अशी नम्र विनंती आहे.

आपले,

गोविंद हर्डीकर
संपादक

भालचंद्र कुलकर्णी
कार्यकारी संपादक

शनिवार, दि. १८ मार्च २०१७, पुणे

शालेय अभ्यासक्रमात 'उद्योजकता' विषयाचा समावेश असायला हवा, असे ठामपणे सांगून श्री. प्रभुदेसाई म्हणाले की, यामुळे उद्योजकतेचे संस्कार लहानपणीच मुलांवर होण्यास मदत होईल. त्यामधून देशहिताचा विचारही वाढीस लागणार आहे. उद्योजकता ही समाजसेवा आहे, ही खूणगाठ मनात असायला हवी. अनेकविध यशस्वी उद्योजकांच्या चरित्रांचा अभ्यासक्रमात समावेश केला जावा. त्याचा निश्चितच चांगला परिणाम होणार आहे. पण हे सारे करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती महत्त्वाची आहे, कारण उद्योजकता हा यशस्वी करिअरचा एक मार्ग आहे, ज्याचा प्रारंभ शालेय जीवनापासून होऊ शकणार आहे.

उद्योगाच्या क्षेत्रात ब्राह्मण समाजाची संख्या कमी आहे, हे वास्तव नाकारता येत नाही; असे स्पष्ट करून ते म्हणाले की, आहे तो पारंपरिक व्यवसाय सांभाळण्यात आपण धन्यता मानतो. मानसिकता चटकन बदलत नाही. नोकरीची चौकट मोडून स्वतंत्रपणे उद्योग सुरू करण्याची मानसिकता ठेवली, तर स्वत:च्या विकासाबरोबरच सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून समाज-विकासासाठी नक्कीच कार्य करता येईल. अर्थशक्ती हा महत्त्वाचा घटक आहे. त्याला प्राधान्य दिलेच पाहिजे. उद्योजकीय मानसिकतेमुळे समाजातही एक प्रकारचा दबदबा निर्माण होण्यास मदत होणार आहे. देशाच्या विकासासाठी, प्रगतीसाठी अन्य घटकांप्रमाणे ब्राह्मण समाजाने योगदान दिले आहेच. आता बदलत्या काळानुसार उद्योग-व्यवसाय क्षेत्रातही योगदान वाढले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## Sethu Bandhu - Girish Bharadwaj



Shri. Girish Bharadwaj, the Padmashree awardee, has been felicitated by Karada Brahman Samaja Bengaluru, on 5th Feb. 2017, the Sansthavardhapan din of the sangh. He was also felicitated by Karhade Brahman Mahasangh on this occasion. Mahasangh Secretary Shri. Ganesh Gurjar, offered him Puneri Pagdee, uparne, sanman patra and memonto.

Shri. Girish Bharadwaj is known for his engineering work of construction of eco-friendly & cost effective hanging bridges in Karnataka. Over 100+ hanging bridges he constructed in remote areas of South India. Hence he was honoured with 'Padmashree' by President of India recently. Shri. Girish Bharadwaj is also famous with his nick name 'Sethu Bandhu' for his inspiring work.

## आरामात मांडी घालून बसण्यासाठी!

## सप्रे योगा सीट

**सुखदायक बैठक योगा सीट ₹1800/-**



- भारतीय बैठकीत आरामात मांडी घालून बसण्यासाठी
- गायक, वादक व रसिक श्रोत्यांना भारतीय बैठकीसाठी.
- पौराहित्य करणाऱ्यांसाठी
- पोथीचे पारायण किंवा जास्त वेळ एका जागी
- मांडी घालून बसून वाचन करणाऱ्यांसाठी.
- मेडीटेशनसाठी
- फोल्ड करता येणारे
- वजनाला हलके

## तुमचा हक्काचा पाठीराखा!

## सप्रे बॅकगार्ड

Curved Back Guard ₹ **3290**
Curved Magnetic Back Guard ₹ **4150**



पाठदुखीच्या त्रासातून मुक्तीसाठी हमखास उपाय. रोज ऑफिसमध्ये खुर्चीवर बसून काम करण्याने कित्येगदा पाठदुखीचा त्रास संभवतो. दरोरोज काम करताना बॅकगार्ड वापरल्यास हा त्रास होणार नाही.


- जास्तवेळ चारचाकी वाहन चालवणाऱ्यांसाठी.
- खूप वेळ खुर्चीत बसून काम करणाऱ्यांसाठी
- कुठल्याही खुर्चीवर ठेवता येते.
- फोल्ड करता येणारे
- वजनाला हलके
- पाठीच्या मणक्याच्या त्रासापासून मुक्ती.

## सप्रे बोर्डस्

पहिला मजला, चित्रशाळा भवन, भानुविलास चौक,
विजय टॉकिजच्या अलिकडे, लक्ष्मी रोड, पुणे 30.
फोन : 020 - 2445 9149, 93710 15193, 93728 50944
वेळ : सकाळी 10.30 ते 2 दुपारी 4.30 ते 8
www.saprepune.com
परगावच्या ग्राहकांनी कुरियरचे ₹ **350/-** जास्तीचे पाठवावे.

* वरील किंमती ६ महिन्यांकरिता वैध

# मंत्र



मंत्र म्हणजे एक ध्वनी, एक शब्द, एक अक्षर किंवा अनेक शब्दांचा एकत्रित समूह- ज्याच्या पुनरुच्चारणाने भौतिक, आत्मिक आणि आध्यात्मिक उन्नती होते. मन एकाग्र करून पूर्ण श्रद्धेने आपल्या आद्य दैवताला स्मरून केलेला विशिष्ट मंत्रांचा जप म्हणजेच नामस्मरण. 'मननात् त्रायते इति मंत्रः।' म्हणजेच मंत्र ह्या शब्दाची फोड केली तर 'मं' हे मानवी मनाचे प्रतीक आहे, जे मनन अथवा चिंतन करण्यास सक्षम आहे; आणि त्र ह्या प्रत्ययाचा अर्थ होतो संरक्षण. म्हणजेच बाह्य विचारांपासून मनाचे संरक्षण करण्याची ताकद मंत्रांमध्ये आहे. आपल्या वैदिक परंपरेत मंत्रांना अतिशय पवित्र स्थान आहे. ह्या मंत्रांच्या उच्चारणाने पवित्र ऊर्जा-स्पंदने निर्माण होत असतात. आणि ह्याच ऊर्जा-स्पंदनांमुळे आपल्याला आत्मिक सुखाची अनुभूती होते. प्रत्येक मंत्राचा विशिष्ट कलावधी असतो. मंत्राची ठरावीक आवर्तने (Repetition) असतात. सनातन धर्मात प्रत्येक एका विशिष्ट देवतेच्या उपासनेसाठी विशिष्ठ मंत्राची रचना वेदांमध्ये आहे. एका मंत्राच्या वारंवार उच्चारणाने निर्माण होणाऱ्या ऊर्जेत वैश्विक शक्तीला आकर्षित करून इच्छित फलप्राप्ती करून घेण्याची ताकद असते. साधकाला त्या मंत्राच्या नामस्मरणाचे योग्य ते फल मिळते. योग्य मंत्रसाधना जितकी काटेकोर आणि पवित्र असेल, तेवढीच उत्तम फले साधकाला मिळतात; परंतु चुकीचे मंत्र उच्चारण, मंत्रसाधकाला अनिष्ट फले देतात. त्यामुळे कोणताही मंत्र स्वतःच्या मनाने कधीच म्हणू नये. गुरूंनी देलेला मंत्र आत्मसात करून त्याचाच यथायोग्य जप करावा.

**मंत्र आणि नामातील फरक :**

**नाम :**

१. नाम म्हणजे भगवंताचे नाव. आपण आपल्या श्रद्धेनुसार कोणत्याही भगवंताचे नाम घेऊन त्याचे पुनः पुन्हा उच्चारण करू शकतो.

२. नाम कोणत्याही वेळी घेता येते. भगवंताचे स्मरण आपण कोणत्याही क्षणी करू शकतो. ह्याला वेळेचे बंधन नाही.

३. नामजपातून केवळ आपली आध्यात्मिक ओढ जागृत होऊन त्या परमेश्वराशी आपण एकरूप होतो. आत्मिक सुखाचा कंद नामस्मरणात आहे.

४. नाम घेताना उच्चाराचे काहीही नियम नाहीत. नाम हे अतिशय सहज-सरळ आहे, जे कोणतीही व्यक्ती सहज घेऊ शकते.

५. नाम भगवंताला अतिशय प्रिय आहे. ज्याच्या मुखात परमेश्वराचे नाम असते, त्याच्या हृदयात ईश्वराचा वास असतो.

**मंत्र :**

१. मंत्र म्हणजे काही विशिष्ट अक्षरांची, शब्दांची वैदिक जुळवणी करून थोर ऋषी-मुनींच्या कृपेने मिळालेले एक वरदान आहे.

२. मंत्राचे काही विशिष्ट प्रकार आहेत. वैदिक मंत्र, तांत्रिक मंत्र आणि शाबर मंत्र. ह्याशिवाय काही बीजमंत्र असतात, काही मूलमंत्र असतात, काही शांतिमंत्र असतात, काही गुरुमंत्र असतात. प्रत्येक विशिष्ट एका फलप्राप्तीसाठी विशिष्ट एका मंत्राची उत्पत्ती झाली आहे. .

३. मंत्राच्या जपाने मनुष्याला भौतिक, आध्यात्मिक, आत्मिक तसेच अन्य अनेक फायदे होतात.

४. मंत्र म्हणण्याचे काही विशिष्ट नियम असतात. म्हणजेच- मंत्र कसा म्हणावा, मंत्राची जपसंख्या किती असावी, मंत्र जपण्यासाठी कोणत्या जपमाळेचा उपयोग करावा, कोणत्या मंत्राची कोणत्या विशिष्ट वेळेस किंवा कोणत्या विशिष्ट कालखंडात उपासना करावी- इत्यादी.

वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा
श्री. संदीप कळके, आर्यादुर्गा ट्रॅव्हल्स, मुंबई - मो. ९८२११४८६११

५. विशिष्ट एका देवतेसाठी तसेच योग्य फलप्राप्तीसाठी विशिष्ट एका मंत्राचे उच्चारण करणे अनिवार्य असते.

**मंत्रसाधनेचे फायदे :**

१. मनाची चंचलता कमी करून स्थिरता प्राप्त होते.

२. एकाग्र चित्त आपल्या आद्य देवतेशी एकरूप होण्यास मदत करते.

३. मंत्राच्या फलश्रुतीप्रमाणे साधनेचे फल प्राप्त होते.

४. भौतिक सुखाच्या मार्गातून साधक हळूहळू आध्यात्मिक आणि नंतर आत्मिक सुखाकडे वाटचाल करतो.

मंत्र कसे तयार होतात?

**मंत्राणां पल्लवो वासो ।**

**मंत्राणां प्रणव: शिर: ।**

**शिर: पल्लव संयुक्तो ।**

**कामधुक् भवेत् ।**

सर्व मंत्रांची सुरुवात ही ॐ ने होते आणि नंतर प्रत्येक मंत्र विभागला जातो. ।। ॐ गं गणपतये नमः ।। ह्या गणेशमंत्राद्वारा जाणून घेऊ मंत्राचे होणारे भाग.

**आद्य ध्वनी ॐ**

**बीजमंत्र :** प्रत्येक एका देवतेचा एक विशिष्ट बीजमंत्र असतो. बीज म्हणजे बी, म्हणजेच त्या बीजात त्या विशिष्ट दैविक शक्तीला आकर्षित करून घेण्याची ताकद असते. उदा. गणपती बीजमंत्र : गं*.

**देवतेचे नाव :** साधक ज्या देवतेची कुठल्याही फलितासाठी उपासना करत असेल, त्या देवतेचे नाव. उदा.- गणपतये.

**पल्लव :** आणि शेवटी पल्लव म्हणजेच नमस्कार. उदा. नमः. मंत्राच्या शेवटी जे पल्लव असतात, त्याचेही विविध प्रकार आहेत. जसे- भुवः, स्वहः, फट्, हुं आणि मंत्रोच्चारात त्यांचा अर्थ भिन्न होतो. मंत्रांची अक्षरे निर्धारित असतात. काही मंत्र एक अक्षरी असतात, उदा. ॐ हा स्वयंभू मंत्र आहे. काही मंत्र पाच अक्षरांच्या जुळणीतून तयार होतात. उदा.- नमः शिवाय हा शिवमंत्र पाच अक्षरी असून नमः शिवाय ही पाच अक्षरे पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश ह्या वैश्विक तत्त्वांचे प्रतिनिधित्व करतात. ह्यालाच पंचाक्षरी मंत्र म्हणतात. ह्याशिवाय काही अन्य मंत्र प्रचलित आहेत, ते पुढीलप्रमाणे-

१. सहा अक्षरी विष्णू मंत्र - ॐ नमः विष्णवे।।

२. सात अक्षरी सूर्य मंत्र - ॐ ह्रीं सूर्याय नमः।।

३. आठ अक्षरी विष्णू मंत्र - ॐ नमो वासुदेवाय।।

४. नऊ अक्षरी गणपती मंत्र - ॐ गं गणपतये नमः।।

५. बारा अक्षरी विष्णू मंत्र - ॐ नमो भगवते वासुदेवाय।। इत्यादी.

मंत्रांचे प्रकार : सगुण मंत्र : सगुण मंत्र म्हणजेच असे मंत्र, ज्यांना स्वतःचे अस्तित्व आहे. हे मंत्र एका निर्धारित शृंखलेने बांधून तयार होतात. विशेषतः देवी-देवतांचे मंत्र हे निर्धारित शब्द, अक्षरांनी रचले जातात आणि त्यांना स्वतःचा असा एक आकार मिळतो. उदा.-

**ॐ दत्ताय साक्षात्काराय नमः।।**

**निर्गुण मंत्र :** निर्गुण मंत्र म्हणजेच असे ध्वनी, ज्यांना स्वतःचा आकार नसतो. जे नाद ब्रह्मांडामध्ये अस्तित्वात आहेत आणि त्यांची सतत पुनरावृत्ती होत असते.

**उदा.- ॐ किंवा सोहऽम**

**बीजमंत्र**

बीजमंत्र म्हणजे काय?

जे तारतात. मंत्रसृष्टीची निर्मिती ज्या बीज तत्त्वाने झाली, ते तत्त्व म्हणजे ॐ कार. तो अनाहत आहे. ॐ हा मूळ नादातून साकारला आहे. मूळ नाद हा नियंत्याचा नाद आहे. नादाला अ+ऊ+म असा आकार दिल्यानंतर तो ॐकार साकारला गेला. आकार दिला म्हणजे त्या त्रिगुणात्मक नादलहरीतून जे काही निर्माण होईल; ते उत्पत्ती, स्थिती व लय या अवस्थेतून जाईल. यानंतर आकाश, वायु व तेज या तत्त्वांतून सृष्टीची निर्मिती झाली. सबब सृष्टीतील सर्व सजीव व निर्जीवांना तिन्ही तत्त्वांतून जावे लागते. या तीन अवस्थांत दडलेले आहे ते मूलतत्त्व- म्हणजे स्थित्यंतर. एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जाणे. या कारणास्तव हे जाणले पाहिजे की- जी कोणती सजीव-निर्जीव अवस्था आपण पाहू, तिची पूर्वीची अवस्था वेगळी असलीच पाहिजे; तसेच त्या सजीव अगर निर्जीवाला आहे त्यापेक्षा वेगळी अवस्था प्राप्त होणारच आहे. कारण पूर्वीच्या अवस्थेतील नको असलेले गुण त्यजून सुधारित अवस्था प्राप्त करीत जाणे, हा निसर्गाचा गुण आहे. उदा.- एकपेशी जीवाच्या निर्मितीपूर्वी जल (आपतत्त्व) निर्माण झाले होते. त्या जलात जलपर्णी होत्या. त्यांचे रूपांतर झुडूपे, झाडे, वृक्षवल्ली यात झाले. कालांतराने जंगले, अरण्ये निर्माण झाली आणि मोठमोठ्या वृक्षांचे रूपांतर मोठ्या ओंडक्यात झाले. ते ओंडके भूगर्भात गाडले जाऊन भूगर्भ,

वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा
सौ. अनुराधा गुणे, कोल्हापूर - मो. ०२३१-२६२७०१४

ओंडके व उष्णता यातून ओंडक्यांचे रूपांतर कोळशात झाले. ज्या कोळशात भूगर्भातील विविध खनिज द्रव्ये जास्त, त्याचे रूपांतर विशिष्ट कोळशात झाले. हजारो वर्षांनंतर वृक्ष व भूगर्भ, विविध तऱ्हेची रत्ने निर्माण झाली. त्यातील जास्त मोलाचे रत्न म्हणजे हिरा. यातून हे स्पष्ट होते की– वृक्ष, भूगर्भ तापमान, दाब इत्यादींतूनच रत्नांची निर्मिती होत असते. म्हणजेच प्रत्येक अवस्थेतील कमी दर्जाची तत्त्वे त्यागत गेल्यास उच्च प्रतीची अवस्था प्राप्त होत असते, या तत्त्वावरच सृष्टीची निर्मिती झाली आहे.

मानव हा सृष्टीतील एक घटक. त्यालाही नियम लागू आहेत. पण नियंत्याने मानवाला आपले स्वरूप दिले आहे. ते स्वरुप म्हणजे, नियंत्याचे अतिअतिसूक्ष्म स्फुल्लिंग– ज्याला आपण आत्मा, प्राण, चैतन्य (SOUL) इत्यादी नावांनी ओळखतो. पण हे स्फुल्लिंग नियंत्याचे स्वरूप असल्याने त्याला स्वतःचे असे गुण आहेत. जसे– तो स्फुल्लिंग सर्व मानवात एकाच स्वरूपात असतो. तो स्फुल्लिंग नियंत्याच्या वायू, तेज, या मूळतत्त्वाशी निगडित असता, तो स्फुल्लिंग परत नियंत्याप्रत जाण्याच्या प्रयत्नात असतो. परत जात असताना तो तेवढाच शुद्ध असावा लागतो, अन्यथा विशुद्धता त्याला गुरुत्वाकर्षणामुळे खाली ओढत असते. मानवी देह हा पूर्ण सृष्टीच्या नियमाप्रमाणेच वागत असतो. स्फुल्लिंग हे ती तत्त्वे मानीत नसते. एकाची ओढ वर जाण्याची, तर दुसऱ्याची ओढ खाली खेचण्याची. यातून मार्ग काढण्यासाठी नियंत्याने मानवाला शब्द या माध्यमाची देणगी खास म्हणून दिली आहे. या माध्यमाचा योग्य उपयोग केल्यास देहातील विशुद्धता क्षीण होऊन लोप पावू शकते. दुरुपयोगाने मानवाला नियंत्याच्या नियोजनाचे प्रयोजन समजू शकत नाही. तथापि, नियंत्याने प्रत्येक सजीवात व निर्जीवात विशिष्ट तत्त्वाचे नियोजन केले असून त्याचा शोध घेतल्यास (ज्ञान प्राप्त करून घेतल्यास) नियंत्याचे स्वरूप– जे आत्मा या रूपात मानवी देहात स्थित आहे, त्याची जाण होऊ शकते. त्यासाठी बीज (तत्त्वाचे) मंत्राचे पुरश्चरण करणे, हा सोपा मार्ग. बीज मंत्र =एकाक्षरी मंत्र=ॐ किंवा श्री.

मंत्रबीज तीन प्रकारची असतात.

पुरुष लिंगी, स्त्रीलिंगी, आणि नपुंसक लिंगी.

१) **पुरुषलिंगी :** ज्या मंत्राच्या शेवटी हुं, फट्, हूं हूं, ठः ठः ही बीजे असतात, ते पुरुषलिंगी मंत्र असतात.

२) **स्त्रीलिंगी :** ज्या मंत्राच्या शेवटी स्वाहा, स्वधा, या बीजाचा प्रयोग होतो, ते स्त्रीलिंगी मंत्र असतात.


३) **नपुंसक लिंगी :** ज्या मंत्राच्या सुरुवातीला व शेवटी नमः चा प्रयोग केला जातो, त्या ते मंत्राला नपुंसक लिंगी म्हटले जाते.हे मंत्र अनिष्टकारक कमी असतात, पण निरर्थक नसतात. यात शरणागत भाव अधिक असतो.

जसे– **ॐ हरि ॐ**

मंत्राचे तीन भाग असतात.

१) मूलमंत्राच्या प्रारंभी जे बीजमंत्र असतात– (जसे ॐ, ऐं, ह्री, क्ली, श्रीं भू, भर्वः, स्वः इत्यादी) यांना मंत्राचे मस्तक म्हटले आहे. मस्तकाच्या आधारावरच मंत्राच्या कामनेचे फल मिळते.

२) मध्यभाग व्याहृति वा बीजाक्षराच्या नंतरचा मंत्राचा मध्य भाग हा देवतेशी संबंधित असतो.



३) **पल्लव :** मंत्राशेवटी नमः, स्वाहा, स्वधा,फट् ठः ठः इत्यादी जे बोलले जाते, त्यानुसार मंत्रजागृतीचे फल मिळते. असे म्हटले गेले आहे– की मन्त्राणा पल्लवो वासः।

मंत्र अक्षराचे निर्णय गुरूकडून माहिती करून घ्यावेत. जसे– शांतिकर्मास नमः/वशीकरणास: स्वाहा / स्तंभनक्रियेस वषट् / विव्द्‌षणास– वौषट् / उच्चाटणासाठी–हुं / व मारणक्रियेस फट् ही बीजे जे कर्म असेल तशी वापरावी लागतात. ती मंत्राच्या शेवटी लावावीत, म्हणजे ती कर्मे फलद्रूप होतात. (मंत्र हे पहिल्यांदा सिद्ध करावे लागतात. त्याकरिता सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, दक्षिणायन, उत्तरायण, रविवार, अमावास्या या काळात अनुष्ठान करून मंत्र सिद्ध करावेत; म्हणजे ते फलद्रूप होतात.


तसेच ह्या मंत्राच्या तेजाचे नित्य रक्षण करावे लागते. ते असे की– कृष्णपक्षातील अष्टमी, चतुर्दशीला, अमावास्या, पौर्णिमा, संक्रांती, तसेच मंगळवार, शनिवार इत्यादी दिवशी रात्रीच्या वेळी संपूर्ण मंत्रावरील अनुष्ठान केले पाहिजे. जर असे केले नाही, तर मंत्र निस्तेज होऊन त्यापासून काहीच फलप्राप्ती होत नाही...

संकलन : **श्री. श्रीगजानन गुर्जर**

**संपादक**

वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा
डॉ. श्री. प्रकाश गुणे, कोल्हापूर – मो. ९४२३८६०८७५

# शिपोशीकरांचा नाथ



**न्या. वैजनाथ विष्णू आठल्ये**
२३ मार्च १९१७-१८ एप्रिल १९८५

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक जडणी-घडणीमध्ये अनेक नामवंत न्यायमूर्तींचा सिंहाचा वाटा आहे.

पेशवाई काळात न्या. रामशास्त्री प्रभुणे यांनी त्या वेळच्या सत्ताधाऱ्यांना परखड बोल सुनावून त्यांनी लोकहिताकडे प्रथम लक्ष द्यावे, असे सांगितले.

लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख हे ब्रिटिश काळात न्यायाधीशपदावर होते. कालबाह्य धर्मपरंपरांवर कठोर आघात करून त्यांनी सामाजिक सुधारणांचा पाया घातला.

ब्रिटिश काळातच न्या. महादेव गोविंद रानडे यांनी पुरोगामी जीवनाची दिशा दाखवून महाराष्ट्राच्या संस्थात्मक कार्यप्रणालीचा प्रारंभ केला. न्या. तेलंग आणि न्या. चंदावरकर हेही त्यांच्यासोबत होते.

स्वातंत्र्योत्तर काळात न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी म. गांधीमार्गमीमांसा अधिक उजळ केली आहे.

अशा आणखी काही न्यायाधीशांच्या नावांचे स्मरण करून महाराष्ट्राच्या प्रबोधनपर्वाचा आलेख ठळक करता येईल.

अशा स्मरण-आलेखातून एक सत्य हाती गवसते ते असे की- न्यायमूर्ती, न्यायाधीश हे त्या-त्या समाजाच्या बौद्धिक दालनाचे अध्वर्यू असतात आणि स्वसंस्कृतीचे सत्व व स्वत्त्व बळकट व्हावे म्हणून लोकशिक्षणाच्या पायवाटांना महामार्ग म्हणून विकसित करण्यासाठी धडपडत असतात.

संत एकनाथांसंदर्भात न्या. म. गो. रानडे यांनी असे उद्गार काढले होते की, 'हेच महाराष्ट्राचे खरे 'नाथ' होत.

त्यांच्या या सार्थ उद्गारांचा अर्थ नाथांच्या लोकशिक्षणाच्या कार्याचे मर्म उलगडण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. तेच शब्द न्या. रानडे यांच्या एकंदर कार्याबाबत यथार्थपणे वापरता येतात.

असे अनेक नाथ प्रत्येक पिढीत शोधता येतात. देश-काल बदलानुसार त्यांच्या कार्यप्रणालीत, तपशिलात फरक पडतो. पण मूळ सूत्र तेच राहते की- मी केवळ माझ्या परिवाराचा नाथ नाही, तर स्वसमाजाचाही मी पोशिंदा आहे आणि या भावनेतूनच त्याचे नाथपण उदयास येते. विस्तार पावते.

आम्हाला अभिमान वाटतो की, असा एक 'नाथ' आमच्याही परिवारात होऊन गेला आणि त्याचे नाव स्वग्राम शिपोशी (जि. रत्नागिरी) पासून ते महानगरापर्यंत अनेक स्वकीयांच्या मुखात शतप्रतिशत आहे!

आम्हा शिपोशीकरांच्या या नाथाचे यंदा शताब्दी वर्ष आहे. ज्यांच्या नामाचा वारंवार गजर करावा, असे त्यांचे नाव सर्वांमुखी 'तात्यासाहेब' असे असले तरी कागदोपत्री उल्लेख करताना- नव्हे, ते लिहिताना- कोकण रेल्वेच्या पॅसेंजर गाडीसारखे ते लांबलचक लिहिले जाते. तेव्हा आनंद- अभिमानाने ऊर भरून येतो! न्यायाधीश वैजनाथ विष्णू आठल्ये, चीफ - मेट्रॉपॉलिटन मॅजिस्ट्रेट, १७, सनबीम चेंबर्स, लिबर्टी सिनेमासमोर, न्यू मरिनलाइन्स, मुंबई ४०० ०२०. एवढा हा लांबलचक पत्ता पोस्टखात्यात मुरलेली माणसंसुद्धा एका दमात वाचत असतील का, अशी शंका आली तर ते गैर म्हणता येणार नाही. पण आमच्या वाकड्या फणसावरचा एखादा फाटका धोंडिबा-पांडोबा मात्र बिडी पिताना ऊर भरून झुरका घ्यावा तशा तोऱ्यात ते पत्त्यासह संपूर्ण नाव सानंद म्हणून दाखवेल! वारकऱ्यांसारखा त्याचा तो भावपूर्ण विठूनामाचा गजर असेल!!

असा नाममहिमा असलेले तात्यासाहेब आठल्ये हे आमच्या शिपोशीचे. त्यांचा जन्म (२३ मार्च १९१७) शिपोशीचा आणि बालपण-शिक्षणही शिपोशीतच झाले. पुढे माध्यमिक शिक्षणासाठी ते रत्नागिरी या

जिल्ह्याच्या गावी गेले, पण तनामनाने अनेकदा वावरले या शिपोशीतच. येथील दैवत श्रीहरिहरेश्वर, समस्त आठल्ये बृहद्परिवार, विशेषत: पिताश्री विष्णुपंत आठल्ये आणि गुरुवर्य श्री. वा. तथा बाबीमास्तर आठल्ये यांच्याबद्दल तात्यासाहेबांच्या मनात नितांत आदराचे, श्रद्धेचे स्थान होते.

त्यांची ही श्रद्धा ज्ञानलक्ष्यी आणि डोळस होती. शिपोशीसारख्या डोंगराळ खेडेगावात राहूनही त्यांच्या वडिलांनी– विष्णुपंत आठल्ये यांनी– जी ज्ञानसाधना केली होती, तिचा सार्थ अभिमान तात्यांना होता. धर्मशास्त्र, वेद–उपनिषदे, न्यायशास्त्र इ. विषयांचा वडिलांनी अभ्यास केला होता; शिवाय आठल्ये घराण्याचा इतिहास ग्रंथ लिहिण्याच्या निमित्ताने त्यांनी जी मोलाची साधनसामग्री जमवली होती, तिचा पुढील अभ्यासकांना फार मोठा उपयोग झाला आहे, असे गोरवोद्गार म. म. द. वा. पोतदार आणि रियासतकार सरदेसाई यांनी काढले आहेत.

शिपोशीचे आणखी एक व्यासंगी व्यक्तिमत्त्व होते– कै. बापूसाहेब आठल्ये. त्या काळी अत्यंत सन्मानाची असलेली 'जगन्नाथ शंकरशेट' स्कॉलरशिप त्यांनी संपादन केलेली होती. बडोद्याच्या सयाजीराव गायकवाडमहाराजांचे नायब–दिवाण म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांचे कायद्याचे ज्ञान एवढे पक्के होते की, कधी कधी लो. टिळकही त्यांचा सल्ला घेत असत. तशीच गोष्ट कायदेपंडित तज्ज्ञ तात्यासाहेबांचे आजोबा कै. वासुकाका आठल्ये यांच्याजवळही असल्याची आठवण रियासतकार सांगायचे.

असा व्यासंगाचा भरभक्कम वारसा घेऊनच तात्यांनी वकिलीक्षेत्रात प्रवेश केला. प्रारंभीच्या काळात देवरूखच्या पित्रे वकिलांकडे आणि पुण्याच्या 'भाला'कार भोपटकरांकडे त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतले. 'कर्जनिवारण बोर्डा'त काही दिवस नोकरी केली आणि पुढे त्यांना ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट अशी नेमणूक मिळाली. कोल्हापूर, सोलापूर, पुणे, सातारा अशी गावोगावी बदली झाली. साताऱ्यात त्यांना जलमंदिर केसचा निकाल अत्यंत निःस्पृहपणे, रामशास्त्री बाण्याने द्यावा लागला. त्यानंतर त्यांची मुंबईत बदली झाली. न्यायक्षेत्रातील त्यांचा लौकिक पुढे वाढता राहिला. त्या महानगरीत तात्यांचे व्यक्तित्व अधिक उजळून निघाले.

मुंबई महानगरीत न्यायाधीश म्हणून त्यांनी अत्यंत निष्ठापूर्वक काम केले. विविध प्रकारचे कज्ज–खटले विवेकबुद्धीने, संयमाने, विश्वासार्हतेने हातावेगळे केले. हाताखालच्या कारकूनाकडूनही गुप्तताभंग होऊ नये, म्हणून अतिदक्षता घेऊन स्वत: एका बोटाने ते टंकलेखन करून निकालपत्र तयार करायचे. त्यांची ही अनन्यसाधारण कर्तव्यनिष्ठा जाणून घेण्यासाठी अभ्यासपूर्वकतेने अनेक कागदपत्रे धुंडाळावी लागतील. नव्या पिढीतील एखाद्या कायदा–अभ्यासकाला त्यामधून एक उत्तम केस–स्टडी सिद्ध करता येईल. मॅजिस्ट्रेट म्हणून तात्यांनी केलेल्या कामगिरीचा कालक्रमानुसार एक सुसंगत इतिहास लिहिला गेला पाहिजे; पण आता तो कोण लिहिणार?

एक सुसंस्कृत व्यक्ती म्हणून कै. तात्यासाहेब आठल्ये यांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आलेख फार अभिमानास्पद आहे. शिपोशीच्या आठल्ये परिवाराच्या व्यासंगसंपन्नतेचा उल्लेख या आधी केलेला आहेच. कै. विष्णुपंत आठल्ये यांच्या रघुनाथ, जगन्नाथ, वैजनाथ आणि एकनाथ या 'नाथ'पुत्रांनी त्या संस्कारसंपन्नतेच्या बळावर आपापला संसार सनाथ–सफल केला आहे. पण वैजनाथतात्यांनी तो वारसा अधिक पुढे नेऊन विद्वत्तेला रसवत्तेची जोड दिली आणि मुंबई महानगरापासून शिपोशी ग्रामजनापर्यंत एक रसगंगा ताजी वाहती ठेवली, याची अभिमानास्पद नोंद केली पाहिजे.

ज्ञानगंगा आणि कलाविश्वाची रसगंगा सतत प्रवाहित राहावी म्हणून वैजनाथरावांनी ज्या अनेक संस्था–माध्यमांचा सक्षमतेने उपयोग करून घेतला, त्यापैकी शिपोशीच्या श्री हरिहरेश्वर देवस्थानाचा अग्रक्रमाने उल्लेख करावा लागेल.

श्री हरिहरेश्वर हे अवघ्या शिपोशीकरांचे अनन्यसाधारण श्रद्धास्थान. दर वर्षी ऐन दिवाळीच्या गुलाबी थंडीत, त्रिपुरी पौर्णिमापूर्व सप्ताहात होणारा हा देवस्थानाचा उत्सव म्हणजे या गावातील नागरिकांची दुसरी दिवाळीच! रांगोळ्यांनी सडे सजवून, स्वत: सजलेल्या सुवासिनी ठेवणीतील वस्त्रालंकारांसह जेव्हा सुहास्यवदने वावरतात; तेव्हा देवळातील दीपोत्सव अधिकच उजळतो, माहेरवाशिणी आणि सुना–नववधू यांच्यातील भेद मावळतो, अवघे म्हातारे तरुण होतात आणि श्रींच्या पालखीचे भोई होण्यासाठी तरुणाई धावपळ करते. ताल–सूरांनी मंदिराचे आवार दुमदुमते!

या दुमदुमलेल्या सोत्साही वातावरणाचा उचित उपयोग तात्यासाहेबांनी सुजाणतेने आणि रसवत्तेने अनेक वर्षे करून घेतला आणि

त्याला वाग्यज्ञाची तसेच रसरंगमंचाची अपूर्व जोड दिलेली आहे. त्यांची ही कामगिरी एखाद्या सांस्कृतिक खात्याच्या मंत्र्यापेक्षा अंगुळभर वरचढ ठरणारी आहे. दत्तो वामन पोतदार, महादेवशास्त्री जोशी, शिवाजीराव भोसले, अप्पासाहेब पवार, राम शेवाळकर असे दिग्गज विद्वान जसे आले; तसेच दाजी भाटवडेकरांसारखे रंगसम्राट, मास्तर कृष्णराव, राम मराठे, भालचंद्र पेंढारकर असे स्वरसम्राट आमच्या लहानशा खेडेगावात हजेरी लावून गेले ते केवळ आमच्या तात्यांच्या बहुसंपर्कतेमुळेच. जितेंद्र अभिषेकी यांचे वडील बाळूबुवा अभिषेकी यांचे कीर्तन हा तर या उत्सवात अनेक वर्षांचा रिवाज होता आणि पुढे ह. भ. प. कऱ्हाडकरबुवांनी ती विद्वत् कीर्तनाची परंपरा चालू ठेवली होती. नंतरच्या काळात ते 'करवीरपीठाचे शंकराचार्य' म्हणून निवडले गेले. तेव्हा त्यांच्या गृहस्वामिनीची संमती मिळवण्याची हळुवार कामगिरी तात्यासाहेबांनी सफल केली होती. धार्मिक क्षेत्रातील विद्वानांबद्दलही त्यांना नितांत आदर वाटत होता. रत्नागिरीतील पुरुषोत्तमशास्त्री फडके यांनाही मुद्दाम निमंत्रित करून देवरूखच्या 'अजॉय' बंगल्यात त्यांनी सश्रद्धतेने धार्मिक उपक्रम संपव केलेला होता.

विद्वानांच्या संगतीत तोच वावरतो, ज्याला विद्वत्तेची पारख असते. कलावंतांची महत्ता तोच ओळखतो, ज्याच्याजवळ शुभ्र मोगऱ्यासारखी प्रसन्न रसवत्ता असते आणि उच्चशिक्षणाची अभिलाषा तोच बाळगतो, ज्याला प्रतिकूल परिस्थितीमुळे राजाबाई टॉवरचे ते सोपान गाठता आले नव्हते. आदरणीय तात्यासाहेबांच्या ठायी ही त्रिवेणी प्रगल्भ रूपात होती. यशस्वी विधिज्ञ असलेल्या तात्यांना त्यांच्या काळात एलएल. बी. वा एलएल. एम. होता आले नाही, कारण महानगरीपासून सुदूर असलेल्या त्यांच्या ग्रामीण भूपरिसरात उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध नव्हती. आपल्या पुढील पिढीला तरी ती सोय सहज सुलभ व्हावी, या हेतूने त्यांनी शिपोशी गावातील शिक्षण संस्थेला सर्व तऱ्हेने प्रोत्साहन तन-मन-धनासह दिलेच, शिवाय शेजारच्या तालुक्याच्या देवरुख गावी विद्यापीठ संलग्न पदवी महाविद्यालय सुरू करण्याचे धाडसी धोरण जाहीर करून प्रत्यक्षात ते सुरूही केले. तो निर्णय धाडसीही होता आणि तेवढाच धोका पत्करणाराही होता. कारण प्रत्यक्षात हाती, तेथील संस्थेचा विस्तृत भूपरिसराशिवाय दुसरे काहीच नव्हते; पण स्वजनाबद्दलचा कळवळा होता, उच्च शिक्षणाबद्दल आस्था होती, स्वसामर्थ्याबद्दल आत्मविश्वास होता आणि तत्कालीन कुलगुरूंसोबत त्यांचा स्नेहसंपन्न संबंध होता.

देवरुखसारख्या लहान गावात १९७२ मध्ये तात्यांनी पदवी महाविद्यालय सुरू केले, तेव्हा तो निर्णय खरोखर धाडसी होता आणि अनेकांच्या चेष्टेचा विषय होता. पण ते स्वत: डगमगले नाहीत. अवघ्या पत्रास विद्यार्थ्यांनी पहिल्या वर्षी प्रवेश घेतला, म्हणून नाउमेद झाले नाहीत. पुरेसे आर्थिक बळ पाठीशी नव्हते, तरी दर महिन्याला प्राचार्य-प्राध्यापकांचा पगार चुकता करण्यात ते कधी चुकले नाहीत. उलट वेळप्रसंगी पत्नीचे दागिने गहाण ठेवून पैशाची तरतूद करण्यात कचरले नाहीत. एकदा आकस्मिक आग लागून कॉलेजचे कार्यालय भस्मसात झाले, तरी डगमगले नाहीत. उलट, पोस्टकार्डाएवढी लांबलचक तार पाठवून 'हडबडू-गडबडू नका, धीर धरा' असा प्राचार्यांना संदेश पाठवून त्यांच्या पाठीशी उभे राहिले. अवघ्या पाच वर्षांत कॉलेजची नवी इमारत उभी करून तत्कालीन केंद्रीय मंत्र्याच्या उपस्थितीत तिचे उद्घाटन केले. मुंबई विद्यापीठाच्या काळात नव्या कुलगुरुंना पाचारण करून त्यांचा सन्मान केला. कॉलेजला कायम स्वरूपाचे संलग्नीकरण मिळवून दिले. दशवार्षिक महोत्सव भरवून पहिल्यावहिल्या प्राचार्यांच्या निवृत्तिकाळी त्यांचा गौरव केला. हाती घ्याल ते तडीस न्या ही समर्थ उक्ती वैजनाथरावांनी सार्थ केली! उच्च शिक्षणास वंचित राहिलेल्या स्वसमाजास समर्थ न्याय देऊन एका न्यायाधीशाने असामाजिक न्यायाचा पाया घातला. म्हणून देवरुखचे 'न्या. आठल्ये आणि वेदमूर्ती सप्रे महाविद्यालय' हेच तात्यांचे खरेखुरे चिरंतन स्मारक होय!

तात्यासाहेब आठल्ये हे कोणी लक्ष्मीपुत्र-उद्योगपती नव्हते, ना कोणी आमदार- मंत्री सत्ताधारी होते; तरीपण ते एक 'विद्यामंदिर' आणि एक 'महा-विद्यालय' उभारू शकले, भरभराटीस आणू शकले, आपल्या हयातीतच अनेक सुविद्य लोकांच्या साक्षीने त्या संस्थेचा लौकिक वाढवू शकले. कारण पितृवारशाने लाभलेली 'सदैव वर्धिष्णू' अशी संस्कारसंपत्ती त्या 'नाथा' घरी अक्षय स्वरूपात होती.

या अक्षय संस्कार खजिन्यात संस्कृत सुभाषितांची अनेक नाणी चलनात होती. तात्यांना आणि त्यांच्या वडील- बंधूंना ती मुखोद्गत होती आणि समयप्रसंगी ती खणखणीत आवाजात अभिव्यक्तही व्हायची. त्यामधील प्राणी आणि पक्षी मुला-माणसांना शहाणपण

शिकवायचे. पोरवयातील त्या संस्कारांचे पुढे ग्रंथप्रेमात परिवर्तन झाले. भारतीय संस्कृतीतील अक्षर वाङ्मयाबरोबरच इतर अनेक ज्ञानक्षेत्रांतील नामवंत पुस्तके तात्यासाहेबांच्या वैयक्तिक ग्रंथसंग्रहात आजही सुस्थितीत आढळतील. त्यांना आणखी एक तशी आवड होती, ती 'दिसणं' आणि 'असणं' या दोन्हींची! सुविद्य व्यक्तीनं कटाक्षानं 'वेल् ड्रेस आणि वेल् अड्रेस' असलं पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. पोषाखामुळे माणसाचा नीटनेटकेपणा अभिव्यक्त होतो, तर ग्रंथांच्या वाचन-चिंतनातून त्याच्या वाणीची प्रगल्पता प्रकट होते, असा त्यांचा अभिप्राय असे. त्याबाबत ' बोले तैसा चाले ' असेच त्यांचे वर्तन होते. एखादी शाब्दिक कोटी, विनोदी किस्सा सांगत समोरच्यांना ते मंत्रमुग्ध करीत. एक वक्ता म्हणून कोणत्याही व्यासपीठावर ते नियोजित विषयाची अभ्यासपूर्वक तयारी केल्याशिवाय जात नसत. सुचेल तसं एखाद्या विषयाची टोलवाटोलवी करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. कोल्हापूरच्या देवल क्लबमध्ये पेटीवादक गोविंदराव टेंबे यांच्या वादनकौशल्यावरील त्यांचे भाषण अनेकांच्या स्मरणात दीर्घ काळ राहिले होते. अमेरिकेच्या प्रवासात त्यांना 'इंडियन ज्युडिशियरी' या विषयावर बोलण्याची संधी मिळाली होती, त्यांच्या त्या अभ्यासाची वाखाणणी 'न्यूयॉर्क टाइम्स' पत्राने केली होती.

अशा या तात्यासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वात विद्वत्ता आणि रसवत्ता यांचा सुरेख संगम होता. त्यामुळे अनेकांना त्यांचा सहवास हवाहवासा वाटायचा. त्यांच्या घरीदारी त्यांच्या चाहत्यांचा अ-नियोजित दरबार अनेकदा भरायचा, तेव्हा वाग्देवी रसगंगा वाहती असायची आणि तिचे वल्हे तात्यांच्या हाती असल्याने होडी किनारी सुखरूप पोचायची.

आदरणीय तात्यासाहेबांचा कौटुंबिक परिवारही परीट-घडीसारखा स्वच्छ आणि अटकर होता. देवरुखच्या नाफडे परिवारातील मथुताई या सौ. उषाताई म्हणून आठल्येंच्या घराण्यात आल्या, ते त्या आपले पाककलानिपुण कौशल्य घेऊनच! मुळातच खाद्यास्वाद अभिरुचिसंपन्न असलेल्या तात्यांचे जिव्हालौल्य दुहेरी वाढले. मेजवानीसमृद्ध आतिथ्य ऐसपैस वाढले. शिपोशीकर इनामदारांचा मुंबईतील निवासही कोकणमेव्यासह 'स्वीट होम' बनले! वागण्या-बोलण्यात शैलीदार असलेल्या दांपत्यास शैला हे कन्यारत्न प्राप्त झाले, 'सनबीम' चेंबर अरुण-प्रकाश पुत्रांमुळे उजळले! असा सफल उषःकाल होऊन अवघाचि संसार सुखाचा सुरू झाला आणि तात्यांनाही पदोन्नती लाभत गेली. 'राखावी बहुतांची अंतरे' या स्वभाववृत्तीमुळे बहुजनांचे घरी येणे-जाणे वाढले. पंडितमैत्री आणि पंडित-पंगतीही वाढल्या. कलाकार येऊ लागले तसे नकलाकारही जमू लागले. चर्चा-संमेलने झडू लागली. पुस्तकांनी कपाटे ओसंडून वाहू लागली आणि घरादाराला एका छोट्या विद्यापीठांचे स्वरूप आले!

या विश्वविद्यालयाच्या कुलगुरूपदी तात्यासाहेबच असणार, हे सर्वांनी गृहीतच धरले होते. सेवानिवृत्तीनंतर खरोखरच तसे मनमोकळे, खळाळते, हसत-खेळत दरबार संमेलने मुंबईत व देवरूखमध्ये भरतही असत आणि रसास्वादाची भूक असलेले अनेक जण तृप्त होऊन जात असतही; पण हे 'आनंदाच्या डोही आनंद तरंग' फार काळ लाभले नाहीत. तात्यांना तब्येतीची सुदृढ साथ निवृत्तीनंतर लाभली नाही. १९८५ च्या एप्रिल १८ रोजी त्यांची प्राण-ज्योत मालवली आणि शिपोशीकरांचा 'नाथ' सर्वांना अनाथ करून गेला! त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**प्रा. वसंत रघुनाथ आठल्ये**
मोबाईल नं. ९८३३१९७१९०
(शब्दांकन - डॉ. सुरेश जोशी)


## सुभाषितांचा खजिना

। यो वह्याशार्जितार्थसत्र कुर्वंस बहुधा वृषं।
। दोषी वांछान्निव स्वास्थ्यं भुक्त्वैवापथ्यमौषधं।

Corrupt's money is as useless even if donated
as medicine to that patient who does not follow the prescribed dietary restrictions.

**वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा**
श्री. प्रभातकुमार अंबर्डेकर, इंदौर - मो. ९८९३४५६९९८

# स्वप्नशास्त्र



आजकाल अनेक जण आपल्याल्या पडलेली स्वप्ने सांगून त्याचे फल किंवा अर्थ विचारत असतात. यापैकी बऱ्याच व्यक्तींना स्वप्न-शास्त्राचेही काही नियम आहेत याची जाणीव नसते. या शास्त्राच्या नियमाप्रमाणे सगळ्याच स्वप्नांचे फल अथवा अर्थ लावता येत नाहीत. काही विशिष्ट स्वप्नांचेच अर्थ व फलित असते. अनेक स्वप्ने ही निरर्थक असतात. जसे की- एखाद्या गोष्टीबद्दल अधिक विचार केला, अथवा बोलले किंवा ऐकले तर त्याविषयीचे स्वप्न पडणे हे स्वाभाविक आहे; म्हणून अशा स्वप्नांचा विचार करू नये. ते म्हणतात ना की, 'मनी वसे ते स्वप्नी दिसे'! स्वप्नांचे प्रकार, तिथीनुसार व रात्रीच्या प्रहरानुसार स्वप्नांचे फल, स्वप्नाचा फलद्रूप होण्याचा कालावधी इत्यादीविषयी काही बेसिक माहिती देत आहे. कोणती स्वप्ने विचारात घेऊ नये, या संबंधात भद्रबाहुसंहितेत हा श्लोक दिला आहे.

**स्वप्नमाला दिवास्वप्नोऽनष्टचिन्ता मयःफलम् ।**
**प्रकृता-कृतस्वप्नैश्च नैते ग्राह्या निमित्ततः।**

स्वप्नमाला, दिवास्वप्न, चिंतेमुळे उत्पन्न स्वप्न, व्याधिग्रस्ततेने उत्पन्न स्वप्न, प्रकृतीच्या (वात-कफ-पित्तादी) विकाराने उत्पन्न व्याधींमुळे पडलेले स्वप्न- ही स्वप्ने फल पाहण्यासाठी विचारात घेऊ नयेत.

**स्वप्नांचे प्रकार** - स्वप्नशास्त्रामध्ये मुख्यत्वे सात प्रकारच्या स्वप्नांचे विवेचन केलेले आहे. दृष्ट, श्रुत, अनुभूत, प्रार्थित, कल्पित, दोषज आणि भाविक अशा सात प्रकारची स्वप्ने असतात. त्यांच्या नावाप्रमाणेच त्यांचे प्रकार आहेत. त्यांची व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

१) **दृष्ट** - जे जागृत अवस्थेत पाहतो तेच स्वप्नात पाहणे, हे दृष्ट स्वप्न.

२) **श्रुत** - जागृत अवस्थेत ऐकतो तेच स्वप्नात पाहणे, हे श्रुत स्वप्न.

३) **अनुभूत** - जागृत अवस्थेत अनुभवलेल्या गोष्टी स्वप्नात पाहणे, हे अनुभूत स्वप्न.

४) **प्रार्थित** - ज्या गोष्टी-विषयी आपण सतत प्रार्थना करीत असतो, त्याबद्दल स्वप्नात पाहणे, हे प्रार्थित स्वप्न.

५) **कल्पित** - जागृत अवस्थेत ज्याची आपण कल्पना करीत असतो ते स्वप्नात दिसणे,हे कल्पित स्वप्न.

६) **दोषज** - कफ-पित्त-वातादी दोषांमुळे आलेल्या विकारात किंवा व्याधिग्रस्त असताना पडलेले स्वप्न, ते दोषज स्वप्न.

७) **भाविक** - वरीलव्यतिरिक्त अचानक ज्याविषयी ना पाहिले, ना ऐकले असे अचानक स्वप्नात काही दिसले तर, ते भाविक स्वप्न.

यातील पहिल्या सहा प्रकारची स्वप्ने ही निष्फळ ठरतात. केवळ भाविक या एकाच प्रकारच्या स्वप्नांचा विचार करायचा असतो आणि केवळ त्याचेच शुभाशुभ फल पाहायचे असते.

*(पुढे येणारे सर्व विवेचन केवळ 'भाविक' या स्वप्न प्रकारालाच लागू आहे.)

यावरून हे लक्षात येईल की- सहज, अचानक पडलेल्या स्वप्नाचेच शुभाशुभ फलित पाहावयाचे असते; सरसकट सर्वच स्वप्नांचे नव्हे. स्वप्न पडल्यावर या गोष्टींचा विचार करावा की- जे स्वप्नात दिसले, त्याबद्दल आपण हल्ली कधी चर्चा केली का? कधी कुणाशी बोललो का? टी.व्ही. अथवा वर्तमानपत्रात पाहिले अथवा वाचले आहे का? आपण हल्ली याची कल्पना करत होतो का? स्वप्नात पाहिले, त्याबद्दल सतत प्रार्थना करत होतो का? असे असेल, तर त्या स्वप्नाचा विचार शुभाशुभ फल पाहण्यासाठी करू नये. तसेच आजारी असताना अथवा व्याधिग्रस्त असताना पडलेल्या स्वप्नाचाही विचार शुभाशुभ फल पाहण्यासाठी करू नये. यानंतर स्वप्नाची वेळ व

तिथी लक्षात घ्यावी; कारण त्यावरच ते स्वप्न कधीपर्यंत, किती काळात आपले फल देईल ते ठरते.

**स्वप्नांचे फल कधी मिळेल?**

**रात्रीच्या प्रहरानुसार स्वप्नांचे फल कधी व किती काळात मिळेल?**

- रात्रीचा पहिल्या प्रहरातील स्वप्नाचे फल एक वर्षात मिळते.
- रात्रीचा दुसऱ्या प्रहरातील स्वप्नाचे फल सात ते आठ महिन्यांत मिळते.
- रात्रीचा तिसऱ्या प्रहरातील स्वप्नाचे फल तीन महिन्यांत मिळते.
- रात्रीचा चौथ्या प्रहरातील स्वप्नाचे फल एक महिन्यात मिळते.
- ब्राह्म मुहूर्तातील (उषाकाल) स्वप्नाचे फल दहा दिवसांत मिळते.
- सूर्योदयापूर्वी (प्रात:काल) पडलेल्या स्वप्नाचे फल अतिशीघ्र मिळते.
- वरील श्लोकात सांगितल्याप्रमाणे दिवास्वप्न (दिवसा पाहिलेले स्वप्न) विचारात घेत नाहीत.

**तिथीनुसार स्वप्नांचे फल कधी मिळेल?**

शु. प्रतिपदा– फल विलंबाने मिळते.

शु. द्वितिया– या तिथीला पाहिलेल्या स्वप्नांचे फल विपरीत मिळते. स्वत:साठी काही पाहिल्यास ते दुसऱ्यांच्या बाबतीत घडते, तर दुसऱ्यांच्या बाबतीतील स्वत:साठी घडते.

शु. तृतीया – विपरीत व विलंबाने.

शु. चतुर्थी व पंचमी – या तिथीवरील फल २ महिने ते २ वर्षात फलद्रूप होते.

शु. षष्ठी ते दशमी – स्वप्न सत्य होते व शीघ्र फल देते.

शु. एकादशी व द्वादशी – विलंबाने फल मिळते.

शु. त्रयोदशी व चतुर्दशी– स्वप्न खोटे व निष्फळ ठरते.

पौर्णिमा– अवश्य फल मिळते.

कृ. प्रतिपदा– स्वप्न निष्फळ ठरते.

कृ. द्वितिया– स्वप्न पूर्ण होते, पण विलंबाने.

कृ. तृतीया व चतुर्थी– स्वप्न खोटे ठरते.

कृ. पंचमी व षष्ठी– दोन महिन्यांनंतर व तीन वर्षांच्या आत फलमिळते.

कृ. सप्तमी– नक्कीच शीघ्र फल मिळते.

कृ. अष्टमी व नवमी– विपरीत फल देते.

कृ. दशमी ते त्रयोदशी– स्वप्ने खोटी ठरतात.

कृ. चतुर्दशी– स्वप्न सत्य होते व शीघ्र फल मिळते.

आमावस्या– स्वप्न खोटे ठरते.

आता स्वप्नात काय काय पाहिल्यावर काय फल मिळते, शुभ व अशुभ स्वप्ने, धनसूचक स्वप्ने, मृत्युसूचक स्वप्ने, शकुन अशी बरीच वर्गवारी आहे. यावर आपल्याकडे बरीच ग्रंथरचना झाली आहे. आता तर स्वप्ने ही मानसशास्त्राशी जोडून अभ्यासली जात आहेत. या सगळ्याचा अभ्यास खूपच मोठा आहे. इथे केवळ बेसिक माहिती देण्याचा उद्देश आहे.

स्थापना: १० मे १९१७
फोन नं. : २४४५६०४७
मोबा. : ९८५०९७९७०६

शतकपूर्तीनंतरची दिमाखदार वाटचाल

मे. डी. व्ही. भाटवडेकर

क्लॉथ मर्चंट्स

६४०, नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता,
नू.म.वि. मराठी शाळेसमोर, पुणे ४११०३०.
email : dwb10051917@gmail.com

सकाळी १० ते १ • दुपारी ४।। ते ८।। • सोमवार बंद

कॉटन, टेरिकॉट, शर्टिंग, सुटिंग, लाँग क्लॉथ,
पॉपलीन सोलापूर चादरी बेडशीट्स,
टॉवेल्स, रेडीमेड पायजमे,
बंडी – कुडते – बर्म्युडा – ३/४ पँट्स

*वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा*
सौ. अंजली आंबर्डेकर, मुंबई – मो. ९८१९८८५६६५

# सर्व कऱ्हाडे ब्राह्मण संघ आणि सभासदांसाठी महत्त्वाचे निवेदन

मा. विश्वस्त मंडळ, कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ दि. ११/२/१७ रोजी कोल्हापूर येथील सभेत झालेल्या निर्णयानुसार घटनेतील तरतुदीनुसार शैक्षणिक आणि वैद्यकीय मदत/ बिनव्याजी कर्ज योजना दि. १ एप्रिल २०१७ पासून सुरू करत आहे. या योजनेचा फायदा प्रथम पसंती कऱ्हाडे ब्राह्मण ज्ञातीमधील विद्यार्थी/ विद्यार्थिनींना, नंतर अन्य ब्राह्मणज्ञातीला आणि नंतर अन्य जातींना दिला जाईल. या योजनेमध्ये महासंघाकडे जमलेल्या रकमेतील ७०% शैक्षणिक ३०% वैद्यकीय मदत या प्रमाणांत देण्याचे ठरले असून त्यासाठी खालील अटी व शर्ती असतील.

**१. शैक्षणिक मदत :**

या विभागांत इ. १० वी पासून पोस्ट ग्रॅज्युएशनपर्यंत तसेच व्यावसायिक शैक्षणिक उपक्रमास आर्थिक मदत/ बिनव्याजी रक्कम देण्यात येईल. त्यासाठी खालील नियम आहेत.

१.१ गरजू आणि हुशार विद्यार्थी/ विद्यार्थिनींना अशा प्रकारचे आर्थिक मदत/ बिनव्याजी रक्कम मंजूर केली जाईल.

१.२ ज्या गरजू हुशार मुला-मुलींना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असतील, परंतु त्यांना ते आर्थिक पाठबळ नसल्याने ते पुढील शिक्षणास वंचित होतात.

१.३ व्यावसायिक क्षेत्रात नैपुण्य प्राप्त करण्यासाठी ज्या मुला-मुलींना एखादे क्षेत्र- अर्थात, सीए, डॉक्टर, इंजिनिअर आर्किटेक्चर इ. घ्यावयाचे आहे.

१.४ कागदपत्रांची पूर्तता -

१.४.१ अर्जदाराने आपल्या हस्ताक्षरांत संपूर्ण नाव पत्ता, ई-मेल, मोबाईल क्र. कोणत्या वर्षासाठी (१० वी /१२वी/पदवी/..... अथवा/ अन्य) मदत/बिनव्याजी कर्ज हवे, त्याची रक्कम

१.४.२ शाळा/कॉलेज/संस्थचे प्रमाणपत्र, फीचा हप्ता : आधारकार्ड क्र., पॅन कार्ड क्र.- झेरॉक्स सत्य प्रमाणित.

१.४.३ पालकांचे नाव, वय, व्यवसाय, पगार/उत्पन्न (व्यवसाय असल्यास घरचा पत्ता व त्याचा दाखला (रेशनकार्ड/ टेलिफोन/वीजबिल इ. पैकी एक)

१.४.४ प्रतिज्ञापत्र - ज्या कारणासाठी आर्थिक मदत / बिनव्याजी कर्ज हवे त्याबद्दल आणि त्याची (enduse) प्रमाणीकरण पावती.

१.५ जर ज्ञातिबांधव असेल तर तो किंवा त्याचे पालक हे त्या त्या शहरात राहत असलेल्या संघाचा क्रमांक द्यावा. सर्वांनी अर्ज फक्त त्या-त्या संघाचे मार्फत पाठवावेत. संबंधित संघाने दिलेल्या माहितीची खातरजमा करून अर्ज मुख्य कार्यालयात संबंधित कागदपत्रांसह पाठवावेत.

**२. वैद्यकीय मदत :**

जर रुग्ण गंभीर आजारामुळे रुग्णालयात दाखल केला असेल, तर त्याला महासंघाकडून वैद्यकीय मदत मंजूर केली जाईल.

२.१ रुग्णाची सामान्य माहिती - नाव, वय, व्यवसाय शहराचे नाव, घराचा पूर्ण पत्ता, दूरभाष क्र. मोबाईल क्र. ई-मेल (असल्यास) आधार कार्ड, पॅन कार्ड, झेरॉक्स सत्यप्रमाणित.

२.२ आजाराचे स्वरूप, कधीपासून उपचार (treatment) सुरू आहेत, उपचार करणाऱ्या डॉक्टरचा आजाराबाबतचा दाखला. वैद्यकिय विमा (Mediclaim Insurance) आणि त्यासंबंधी माहिती.

२.३ रुग्णाने या रोगासाठी आत्तापर्यंत किती खर्च केला त्याची माहिती आणि पुढील उपचारासाठी येणारा अंदाजे खर्च डॉक्टर प्रमाणपत्रासह.

२.४ जर औषधे खरेदी करणार असल्यास अथवा खरेदी केली असल्यास औषधे घेतलेल्या दुकानदाराची देयके (Bills).

जर अर्जदार संघाचा सभासद असेल, तर त्या संघाने अर्जदाराची माहिती पडताळून पाहून आपली शिफारस करून मुख्य कार्यालयात पाठवावी. जर सभासद नसेल तरीसुद्धा प्रथम

वसंतोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा
श्री. धर्मराज पंडित, कोल्हापूर - मो. ९८६०३५१०५०

आपली ज्ञाती, नंतर अन्य ब्राह्मण ज्ञाती आणि नंतर अन्य जाती यांचे सर्वांचे अर्ज त्या-त्या संघाने पडताळून पाहून ते मुख्य कार्यालयांत संबंधित कागदपत्रांसह पाठवावेत.

शैक्षणिक अथवा वैद्यकीय मदत/बिनव्याजी कर्ज मंजूर करण्याचे सर्व अधिकार यासाठी नेमलेल्या समितीस राहतील आणि रक्कम किती मंजूर करणे, कोणत्या माध्यमातून रक्कम देणे आणि त्या दिलेल्या रकमेच्या पावत्या जमा करून घेणे. हे काम असेल व त्या समितीचा निर्णय अंतिम असेल; कारण असणारी रक्कम आणि आलेले अर्ज यांचा ताळमेळ बसवून अशी मदत/बिनव्याजी कर्ज मंजूर करावयाचे आहे.

सर्व संघांचे अध्यक्ष, कार्यवाह आणि कार्यकारिणी यांनी याबाबत योग्य तो प्रचार-प्रसार आपल्या कार्यक्रमांतून, विविध सभांमधून करून या योजनेस योग्य तो प्रतिसाद मिळेल असे पाहावे. महासंघाच्या प्रत्येक संघास याबद्दल वेगळी माहिती पाठवत आहोत.

त्या फुलांच्या गंधकोषी सांग तू आहेस का?<br>
त्या प्रकाशी तारकांच्या ओतिसी तू तेज का?<br>
त्या नभांच्या नीलरंगी होउनीया गीत का?<br>
गात वायूच्या स्वरांनी सांग तू आहेस का?<br>
मानवाच्या अंतरीचा प्राण तू आहेस का?<br>
वादळाच्या सागराचे घोर ते तू रूप का?<br>
जीवनी या वर्षणारा तू कृपेचा मेघ का?<br>
आसमंती नाचणारी तू विजेची रेघ का?<br>
जीवनी संजीवनी तू, माउलीचे दूध का?<br>
कष्टणाऱ्या बांधवांच्या रंगसी नेत्रात का?<br>
मूर्त तू मानव्य का रे, बालकांचे हास्य का?<br>
या इथे अन् त्या तिथे रे, सांग तू आहेस का?

गीत - सूर्यकांत खांडेकर<br>
संगीत - पं. हृदयनाथ मंगेशकर<br>
स्वर - पं. हृदयनाथ मंगेशकर





# रोज वापरल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थातील 'भेसळ' ओळखण्यासाठी काही खास टिप्स

**दूध**

दुधातील भेसळीच्या अनेक घटना ठिकठिकाणी घडत असतात. दुधात डिटर्जंट मिसळलं जातं किंवा दुधाच्या नावावर काही जण सिंथेटिक मिल्कही विकतात. ही भेसळ जीवावरही बेतू शकते, म्हणूनच ती ओळखणं अत्यंत गरजेचं आहे.

१० मिलि. दूध तितक्याच पाण्यात एकत्र करा. त्यात फेस झाल्यास ती डिटर्जेंटची भेसळ आहे. तर, सिंथेटिक दूध चवीला वाईट असतं आणि ते उकळवताना त्याला फिक्कट पिवळा रंग येतो.

**लाल तिखट**

रोज भाजी-आमटीला फोडणी देताना वापरल्या जाणाऱ्या लाल तिखटात विटेचा चुरा किंवा मीठ मिसळलं जातं. ही भेसळ ओळखणं अगदीच सोपं आहे. एक चमचाभर लाल तिखट ग्लासभर पाण्यात एकत्र करा. हे पाणी जर रंगीत झालं तर त्यात भेसळ आहे, असं समजा.

**पनीर**


पनीरची भाजी आपण अगदी चवीनं, बोटं चाटून-पुसून खातो. पण या पनीरमध्ये स्टार्च मिसळून डेअरीवाले आपल्याला उल्लू बनवू शकतात. अशा वेळी, पनीर घरी आणल्यानंतर ते थोड्याशा पाण्यात घालून उकळावं आणि थंड झाल्यावर त्यावर आयोडिन सोल्युशनचे काही थेंब टाकून त्याचा रंग तपासावा. पनीर जर निळं झालं, तर ते टाकून द्यावं किंवा दुकानात नेऊन 'साभार' परत करावं.

**मध**

आपल्याकडचा मध शुद्ध आहे की नाही, हे तपासून पाहायचं असेल, तर कापसाची वात त्यात भिजवून पेटवून पाहावी. ती जर तेवत राहिली, तर मध शुद्ध आहे. भेसळयुक्त मधात भिजवलेली वात सहजासहजी जळत नाही. ती तडतडते.

**खोबरेल तेल**

खोबरेल तेलात बऱ्याचदा इतर तेलं मिसळून ग्राहकांची फसवणूक केली जाते. ही भेसळ ओळखण्यासाठी खोबरेल तेलाची छोटी डबी फ्रीजमध्ये ठेवावी. जे गोठेल ते खोबऱ्याचं तेल आणि बाकीची भेसळ.



**धने पावडर**

आपल्या जेवणाला चव यावी आणि पोटदुखी वगैरे होऊ नये, म्हणून आपण धने पावडर आवर्जून वापरतो. पण त्यात लाकडाचा भुसा असेल तर? घाबरू नका. थोड्याशा पाण्यात धने पावडर शिंपडा. भुसा असेल तर तो पाण्यावर तरंगेल आणि आपल्या शंकेचं निरसन होईल.



**जिरं**

जिऱ्यातील भेसळ ओळखायची असेल, तर थोडंसं जिरं तळहातावर घेऊन ते चोळावं. जर जिरं काळं पडलं तर ते भेसळीचे चिन्ह आहे.



**काळी मिरी**

भेसळयुक्त काळी मिरी खूप चमकते आणि तिला हलकासा रॉकेलसारखा वास येतो.

**सफरचंद**

'ॲन ॲपल ए डे, कीप्स डॉक्टर अवे', हे जरी खरं असलं तरी आपण जे चकचकीत सफरचंद खातोय, त्याला मेणाने पॉलिश तर केलेलं नाही ना, हे पाहणं आजकाल अत्यावश्यक झालंय. त्यासाठी इतकंच करा की, ब्लेड किंवा पातळ सुरी हलकेच फळाच्या सालावरून फिरवा. पांढऱ्या रंगाचा काही पदार्थ ब्लेड-सुरीला चिकटला, तर ते मेण असेल. असं सफरचंद सालं काढून खा किंवा फळवाल्याला परत करून टाका.



**हळद**

आपलं रोजचं जेवण हळदीशिवाय होऊच शकत नाही. पण या हळदीत जर मेटानिल येलो हा घटक असेल, तर तो कॅन्सरला कारणीभूत ठरू शकतो. म्हणूनच हळद तपासून घेतलेली बरी. हळद पावडरमध्ये पाच थेंब हायड्रोक्लोरिक ॲसिड आणि पाच थेंब पाणी घालावं. त्याला जर वांग्याचा रंग आला, तर ही हळद कॅन्सरला आमंत्रण देऊ शकते.

**हळकुंड**

काही जण हळकुंड आणून, ती कुटून घरीच हळद पावडर तयार करतात. अशा वेळी, हळकुंड पॉलिश केलेली नाहीत ना, हे तपासणंही सोपं आहे. एका कागदावर हळकुंड ठेवून त्यावर थंड पाणी ओतावं. हळकुंडाचा रंग गेल्यास ते पॉलिश केलेलं आहे, हे सहज कळू शकेल.

**दालचिनी** 

दालचिनी असली की नकली हे ओळखणंही कठीण नाही. दालचिनी हातावर रगडल्यानंतर जर तुमच्या हाताला रंग लागला, तर ती अस्सल दालचिनी समजावी.

**फ्रोजन मटार**



सध्या फ्रोजन मटारची खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जाते. ते स्वस्तही पडतात आणि टिकतातही खूप. पण त्यात मेलाकाइट ग्रीन या घटकाचा समावेश असल्यास पोटाशी संबंधित काही विकार होऊ शकतो. म्हणून आपण खरेदी केलेल्या मटाराचे थोडे दाणे थोड्याशा पाण्यात घालून ते ढवळावे. साधारण अर्ध्या तासानंतर त्याचा रंग पाहावा. पाणी रंगीत झालं, तर हे मटार न खाणंच श्रेयस्कर.

**चहा पावडर**



चहा पावडरमध्ये वापरलेली चहा पावडर बेमालूमपणे मिसळली जाते किंवा अन्यही भेसळ होते. चहापत्ती थंड पाण्यात घातल्यानंतर रंग सोडत असेल तर त्यात भेसळ आहे, हे निश्चित!

# पर्यावरण / समाजकारण

अकलूज गावचा एक माणूस गेली ३० ते ३५ वर्षे सीताफळांच्या बिया साठवतो. मुंबईला-पुण्याला कामानिमित्त जावं लागतं. तो पिशवी भरून त्या घेतो आणि जाताना घाटात गाडी थांबते तिथं तिथं दरीत फेकून देतो. हल्ली त्या घाटावर पाट्यांमध्ये पिकलेली सीताफळं घेऊन अनेक जण विक्रीला बसलेले असतात.

अलीकडे या माणसानं खास त्यांच्याकडे जाऊन विचारलं,

'कुठून आणता ही सीताफळं? तुमचे मळे आहेत का?'

'कुठले मळे साहेब? आम्ही गरीब माणसं. लोक घाटात शेकड्यानं बिया टाकतात. झाडं उगवलीत दरीत. सारं फुकटच. आम्ही फळं गोळा करतो, पिकवतो आणि तुम्हाला विकतो. शेकडो गरीब कुटुंबं चालतात यावर इकडची.'

त्या विक्रेत्याकडं गहिवरल्या डोळ्यानं पाहत ही व्यक्ती डझनभर सीताफळं विकत घेते- पुन्हा बिया गोळा करून घाटात फेकण्यासाठी!

बारमाही काम करता येईल असा हा देश.

बिया फेकल्या तरी अमृतासमान चव असणारी फळे पिकवणारी इथली माती.

बिया साठवून घाटावरून त्या दरीमध्ये फेकणारा एखादा जरी भेटला, तरी हजारो कुटुंबांची तो सोय करून जातो.

वर-वर किरकोळ वाटली तरी ही घटना अंतर्मुख करते.

ही दृष्टी किती लोकांची असते? जर प्रत्येकानं असा एखादा छंद बाळगला, तर काळ बदलून जाईल.

अशा माणसांना काय व्यक्तिगत दुःख असत नाही, असं नाही... तोही गांजून गेलेला असतो. पण अशा प्रेरणा तो दाबत नाही, तो त्या कृतीत आणतो.

आपल्याला आपलं अंतर्मन कित्येकदा एखादं सत्कृत्य करायला सांगत असतं; पण किती वेळा आपण ते करतो?

एखाद्या आंधळ्या भिकाऱ्याला काही तरी दान करावं, म्हणून खिशात गेलेला हात कित्येकदा तसाच बाहेर येतो.

सरहद्दीवर विनाकारण गोळीबार करणारे शेजारी देश, शहरा-शहरात स्फोट घडविणारे अतिरेकी, देशात राहून देशद्रोह करणारे काही जण आणि अशा अनेक उलट्या काळजाच्या व्यक्तींच्या समूहामध्ये उद्विग्न झालेले आपण सारे.

आपल्याला बिया फेकणारी अशी एखादी व्यक्ती भेटली, तर शहारून जातो आपण. मनाला कुणी तरी गार फुंकर मारून सुखावतंय, असं वाटतं.

जंगलाची तोड होते. रस्त्यासाठी, इमारतींसाठी झाडांची तोड होते. तितक्या प्रमाणात ती पुन्हा लावली जातात का?

तोडलेल्या झाडांवरच्या पक्ष्यांचं पुढं काय होतं, याचाही विचार नको का करायला?

झाडांशिवाय आणि पक्ष्यांशिवाय असलेलं गाव ते गाव कसलं?

ग्लोबल वॉर्मिंगच्या जागतिक परिषदा होत राहतात. मीडियातून त्यांचा उदो-उदो होतो. त्यातून साध्य काय होतं?

झाडं लावणारे, ती जगवणारे, पक्ष्यांना दाणे टाकणारे, झाडांवरच्या घरट्यांकडं भरल्या डोळ्यांनी बघणारे आणि सीताफळांच्या बिया फेकणारे... शेवटी पडद्याआडच राहतात.

सर्वेपि सुखिनः संतु। सर्वे संतु निरामयः ...

ही संस्कृत उक्ती काय-

किंवा

दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात।।

हे ज्ञानदेवांच्या पसायदानातील सूत्र काय-

किंवा

या बिया फेकणाऱ्या माणसाची प्रेरणा काय...

या तिन्ही गोष्टी एकच आहेत, असं वाटून जातं...

# सुखी व्हायचंय?



एका शहरातला एक तरुण मुलगा खूप मेहनती, खूप विचारी, खूप अभ्यासू होता. त्याला चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. नंतर लग्न झाले. नवीन-नवीन संसार. सुरुवातीचे दिवस छान गेले. पण हळूहळू घरात बारीक-सारीक कुरबुर सुरू झाली. जेवणावरून, बाहेर फिरायला जाण्यावरून. काही वेळा कारणे खूप क्षुल्लक असायची; पण वाद पेटायचा. मग घरात अबोला. एकूण वातावरण बिनसू लागलेले.

असाच एकदा तो वैतागून घरून ऑफिसात निघालेला होता, तर गाडी काढताना पार्किंगमध्ये एक तेजस्वी पुरुष समोर उभा दिसला. त्या पुरुषाने स्वतःहून या तरुणाला विचारले, ''बेटा, दुःखी दिसतोस. काय झालं? मी काही मदत करू का?''

हळव्या स्वभावाच्या त्या तरुणाला एकदम गहिवरून आलं. त्याने कबुली दिली- ''होय महाराज, मी दुःखी आहे. पण मला सुखी व्हायचं आहे. एक तरी क्षण, एक तरी मिनिट मला सुख पाहायचे आहे... काय करू?''

तो तेजस्वी पुरुष म्हणाला, ''नक्की सुखी होशील. मात्र त्यासाठी माझ्यासोबत आत्ता अर्धा तास यावं लागेल. जमेल का?''

तरुण म्हणाला, ''हो, चालेल.''

मग ते दोघे एकत्र पायी-पायी निघाले. जवळच एक बाग होती. तिथे तेजस्वी पुरुष आत गेला, मागोमाग तो तरुणही गेला. गेटजवळच एक जडसा दगड पडला होता. तेजस्वी पुरुषाने तो दगड उचलून तरुणाच्या हाती देऊन मागोमाग चालत यायला सांगितले. तो दगड हातात घेऊन तरुण निघाला. पाच मिनिटांनी त्याच्या हाताला रग लागली म्हणून त्याने दगड दुसऱ्या हातात घेतला. अशीच पंधरा मिनिटे गेली. आता तरुणाचे दोन्ही हात दुखू लागले, तरी चालणे सुरू होतेच. शेवटी अर्ध्या तासाने तरुणाची सहनशक्ती संपली. दगड दोन्ही हातांनी पकडून तो त्या तेजस्वी पुरुषाला म्हणाला, ''आता सहन होत नाहीये.''

यावर तो पुरुष म्हणाला, ''आता तो दगड खाली ठेव.''

त्याबरोबर तरुणाने दगड लगेच टाकला. 'हुश्श' केले. घामाघूम झालेला चेहरा पुसला. ओझे कमी झाल्याने तो थोडा ताजातवाना झाला. त्याच क्षणी तेजस्वी पुरुष म्हणाला, ''हाच तो सुखाचा क्षण आहे. ओझे कमी झाल्याने तू आत्ता स्वतःला खूप सुखी समजतोयस ना?''

तरुण म्हणाला, ''होय महाराज.''

मग तो पुरुष म्हणाला, ''जीवनाचेदेखील असेच आहे. तो दगड म्हणजे दुःख/निराशा आहे. तो दगड एक मिनिट हातात ठेवला, थोडे दुखले. पाच मिनिटे ठेवला, अजून जास्त दुखले. अर्धा तास ठेवल्यावर सहन करण्यापलीकडचे दुखले. आता हे आपल्यावर आहे की, आपण तो दगड किती वेळ हातात ठेवणार? तुम्ही तो दगड जितक्या लवकर खाली ठेवाल, तितक्या लवकर सुखी व्हाल आणि जमलेच तर असले दगड उचलूच नकोस. आयुष्यात कधीच तू दुःखी होणार नाहीस.''

जगात आपल्याला दुखवू शकेल अशी एकच व्यक्ती असते, ती म्हणजे आपण स्वतः! दुसरे कुणीही, कितीही ठरवले तरी आपल्याला दुःखी करू शकत नाही..

## चविष्ट चारोळ्या

शेजाऱ्याला टाळण्यासाठी
पटकन् लिफ्ट सुरू केली
मध्येच लिफ्ट अडकली
अन् माझी सुटका त्यानेच केली

पटकन् निघून जाता यावं
म्हणून बसलो सभेच्या टोकाला
सभा गेली उधळली
अन् काठी बसली पहिली मला

अंतयात्रेसमयी
एक सुखद गोष्ट दिसते
उपस्थितांची बडबड कमी
अन् मदतीची धाव असते

प्रदीप पु. सातवळेकर

भ्र. ९८६९६८३३३५

## All Insurance Services under one roof



- Senior Citizen Pension Plan
- Child Career Plan
- Daughter Marriage Plan
- Life Long Pension Plan
- Foreign Trip/Travel Insurance
- Health Insurance for Family
- Motor Insurance
- House/Property Insurance
- Group Insurance
- Housing Society Insurance
- Workmen Compensation
- Accident Insurance
- Marine Insurance

**Mangesh Jambhekar**
Mobile : 9819750955 Email : mangesh.jambhekar@gmail.com
Office Add: Insurance Specialist
Room No: S 10, Ground Floor, Roshani CHS. BLDG NO R/12,
Sai Siddhi Complex, Near Balasaheb Thakare Truma Care Center,
Western Express Highway, Jogeshwari East, Mumbai - 400060.

।।श्री।।

स्थापना : गणेश चतुर्थी १९९३

सर्व कऱ्हाडे ब्राह्मण परिवारास हार्दिक शुभेच्छा

प्रकाश जठार यांचे

# ज्योती एन्टरप्रायझेस

(निवडलेला किराणा माल, सर्व प्रकारचे मसाले व
सुका मेवा होलसेल व रिटेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण)

पत्ता - गाळा नंबर २, गिरीश अपा., गोपाळ नगर,
गल्ली नंबर २, डोंबिवली (पूर्व) पिन - ४२१२०१,
फोन-०२५१२४४१२१२, भ्रमणध्वनी - ९८१९२५१४१२

nakhye
UDYOG

AT YOUR SERVICE

NAKHYE'S
ASHOK
SWEETS

ALL TYPES OF MITHAI, BENGALI SWEETS, FARSAN, SNACKS, DRY FRUITS.

M/S. NAKHYE FOODS LLP. Tel - **+91251 2482106, +91251 2483476.**
•**SHOP NO.1:** Everest House, Pandit Deendayal Rd. Dombivli (W)-421202. Mo. - **97026 55000.**
•**SHOP NO.2:** Everest Shopping Center, Phadke Rd, Dombivli (E)-421201. Tel - **+91251 2433193. Mo. - 9702811122.**

Shubhmangal
CATERERS & AC HALL

Everest Shopping Center, Lokmanya Tilak Chowk,
Near Railway St., Dombivli (E) - 421201.
Tel: (Hall) **0251 - 2860720, 9702666000**, Fax: **2483351.**
Email: ynakhye@gmail.com
Website: **www.shubhamangalhall.com**

EVEREST
HALL

AN AIR CONDITIONED HALL
FOR ALL PROGRAMMES
WITH INDOOR CATERING FACILITY
AND ALL OTHER SERVICES

M. Gandhi Road, Dombivli (west).
Tel.: **9702622000, 9702011131**

EVEREST
DISTRIBUTORS

**DISTRIBUTORS FOR**
**Kwality Walls (HUL), Idea Cellular, Tropicana (Pepsico), Chitale Bandhu Mithaiwale, Mother Dairy**

Everest House, Pandit Deendayal Road,
Dombivli (W) - 421202. Maharashtra, India.
Tel: **+91 251- 2483476, 2482106.**
Fax: **+91 251- 2483351.** Email: **anakhye@gmail.com**

finVantage


**EQUITY: Derivatives Commodities, DP, IPO, Mutual Fund, Realty, Life and General Insurance, PMS and Financial Planning Advisory**

M/s. Finvantage Services(P) Ltd.
2nd Floor, Everest House, M. G. Road,
Dombivili (W)-421202. Tel.: **91251 2480305**

**वसंतोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा**
**श्री. संजय अंबर्डेकर, ठाणे - मो. ९८२०४१७९८१**

# Padmashree Awardee Shri Girish Bharadwaj

## Sethu Bandhu



**Engineer who has built more than 100 low cost and eco-friendly suspension bridges connecting remote villages across India**

- Has built 100+ bridges across Karnataka, Kerala & Andhra Pradesh
- **Improved connectivity aiding the development of villages**
- His bridge building technology costs 1/10th of conventional steel bridge
- **Reduced building time to 3 months** whereas conventional steel bridges take 3 years.
- Bridges are eco friendly & safe


Engineering graduate on failing to get a Job devoted himself to build bridges

**Social Work** | Male | 66 Yrs | Karnataka



**Padma Sri**





डॉ. योगेश गुर्जर (कृत्रिम हृदय डिझायनर संशोधक-पेटंट होल्डर) : एका हृद्य समारंभात डॉ. ए.पी. कुलकर्णी, डायरेक्टर गोखले इन्स्टिट्युट, पुणे ह्यांच्या हस्ते 'अनुकरणीय उद्योजक' सन्मान (Award) स्वीकारताना.

Regd.Periodical RNI- No. MAHAMAR/2013/51438 (DECL.No. SDM/PUNE/SR/89/2013)




BOOK -POST(Regd. Periodical)

प्रेषक:

संपादक - कऱ्हाडे ब्राह्मण महासंघाचे 'संपर्क'
कऱ्हाडे ब्राह्मण महासंघ
द्वारा - कऱ्हाडे ब्राह्मण संघ, ४३७, नारायण पेठ,
'अनिश प्रासाद' अपार्टमेंट्स, भटांचा बोळ,
पुणे- ४११ ०३०

To,